परमेश्वराजवळ आमच्यातील प्रत्येकासाठी एक योजना व हेतू आहे. आमच्या जीवनासाठी त्याचा हेतू पूर्ण करण्यासाठी देवाशी सहकार्य करा. आपल्या जीवनासाठी परमेश्वराचा हेतू कसा ओळखावा आणि जी योजना त्याने आपल्या जीवनासाठी आखली आहे, ती यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी काय करावे लागेल हे आपणास ह्या अभ्यासाद्वारे शिकावयास मिळेल.

आपल्या जीवनासाठी परमेश्वराचे हे स्वप्न बघण्यास सुरवात करा! आपल्या जीवनासाठी परमेश्वराचा हेतू पूर्ण करण्यासाठी जगण्यापेक्षा दुसरा उच्च व उत्तम हेतू आणखी कोणताच असू शकत नाही! त्याच्या स्वर्गीय पाचारणाचे अनुसरण करण्यात व ते पूर्ण करण्यात जे समाधान आहे, ते इतर कुठेच नाही. ज्या गोष्टींची योजना त्याने आमच्या जीवनासाठी केली आहे, ती पूर्ण करतांना येशूसोबत चालण्यापेक्षा मोठे धैर्य आणखी कुठलेच नाही.

आपल्या जीवनासाठी परमेश्वराच्या स्वप्नाचा पाठपुरावा करतांना आपण ह्या प्रवासाचा आनंद अनुभव करा!

आशीष रायचूर



# आपल्या जीवनासाठी परमेश्वराचा हेतू पूर्ण करणे

आशीष रायचूर

मुद्रण व वितरणः **ऑल पीपल्स चर्च तसेच विश्व सुसमाचार सम्पर्क, बँगलोर**
प्रथम आवृत्ती २०१२

प्रबन्ध सम्पादक/प्रमुख प्रकाशक : वॅलेन्टिना ह्यूबर्ट
भाषांतरकार व प्रूफ रीड़िंग : डॉर्थी शरदकान्त वाघमारे
मुखपृष्ठ व ग्राफिक्स डिज़ाइन : करुणा जेरोम, बाईफेथ डिज़ाइन्स

**Contact Information:**
All Peoples Church & World Outreach
2nd Floor, No. 7M, 2nd Block,
HRBR Layout, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-65970617
Email: contact@apcwo.org
Website: www.apcwo.org

विनामूल्य वितरणासाठी
हे पुस्तक विनामूल्य वितरणासाठी ऑल पीपल्स चर्चच्या सदस्यांच्या,
भागीदारांच्या व मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे.

(Marathi book - Fulfilling God's Purposes for your Life)

# आपल्या जीवनासाठी परमेश्वराचा हेतू पूर्ण करणे

# अनुक्रमणिका


परिचय 1

**१. परमेश्वराजवळ आपल्या जीवनाप्रीत्यर्थ एक हेतू आहे हे जाणून घेणे** **३**

१.१ परमेश्वर योजना, हेतू, संकल्पना आणि लक्ष्य यांचा परमेश्वर आह ०३

१.२ परमेश्वराजवळ एक हेतू आहे - 'सामान्य हेतू' किंवा 'मास्टर प्लान', जो तो ह्या पृथ्वीतलावर पूर्ण करीत आह ०४

१.३ परमेश्वराजवळ आणणासाठी एक हेतू आहे - 'एक विशिष्ट योजना ०५

१.४ आमच्यासाठी परमेश्वराची योजना नेहमीच उत्तम असते ०७

१.५ परमेश्वराची योजना पूर्ण करण्यासाठी आम्हास त्यास सहकार्य करावे लागेल ०७

१.६ आपल्या जीवनासाठी परमेश्वराच्या योजना शोधणे आणि त्याचे अनुसरण करणे. ०८

१.७ परमेश्वराची योजना व हेतू पूर्ण करण्यासाठी परमेश्वर आपणास तयार करील. ०६

१.८ आम्ही चुका करतो - परतु आमच्या अपयशावर विजय मिळविण्यासाठी आणि त्याचे पाचारण पूर्ण करावयास परमेश्वर आमचे सहाय्य करू शकतो ०९

१.९ परमेश्वराचा पूर्ण हेतू करण्यासाठी सैतान आम्हास थांबविण्याचा पूर्ण प्रयत्न करील १०

१.१० आम्हास परमेश्वराच्या पाचारणाकडे आपले लक्ष दिले पाहिजे १०

१.११ आमच्यात धैर्य असले पाहिजे ११

**२. आपल्या जीवनासाठी परमेश्वराचा हेतू ओळखणे १२**

२.१ परमेश्वराच्या वचनांची शिकवण व निर्देश ओळखणे १५

२.२ आपल्या जीवनाचे 'बीज' ओळखणे. १८

२.३ आपल्या अंतःकरणातील हालचाल ओळखणे २०

२.४ परमेश्वराने दिलेली कृपा ओळखणे २२

२.४.१ नवीन करारात 'कृपा' शब्द दाखवितो २२

२.४.१.१ दैवी कृपा २२

२.४.१.२ दैवी चारित्र्य २२

२.४.१.३ दैवी समर्थता २२

२.४.२ कृपा आणि कार्य २४

२.५ परमेश्वराच्या आत्म्याचे मार्गदर्शन ओळखणे २४

२.५.१ पवित्र आत्मा आमच्याशी कशाप्रकारे बोलतो? २५

२.५.२ आम्हास कसे माहीत की पवित्र आत्मा बोलत आहे? २६

२.६ परिस्थिती ओळखणे १६
२.७ दैवी सल्ला आणि बुद्धी ओळखण २८
२.७.१ व्यक्तीचे आपले ज्ञान व अनुभव यावर आधारित सल्ला ३०
२.७.२ परमेश्वराच्या लिखित वचनावर आधारित सल्ला ३१
२.७.३ भविष्यात्मक प्रेरणेवर आधारित सल्ला ३१
२.८ काळ व वेळ ओळखण ३१
२.९ परमेश्वराची कार्य करण्याची पद्धत ओळखणे ३४
**३. परमेश्वराची तयारीची प्रक्रिया ओळखणे ३७**
३.१ तयारीच्या प्रक्रियेद्वारे परमेश्वर काय तयार करू इच्छितो? ३७
३.१.१ दैवी चारित्र्य ४२
३.१.२ सर्व गोष्टींत परिपक्वता ४३
३.२ परमेश्वर आम्हास कसे तयार करतो? ४४
३.२.१ वचन ४४
३.२.२ पवित्र आत्मा ४४
३.२.३ इतर लोकांद्वार ४५
३.३ परमेश्वराच्या तयारीच्या प्रक्रियेतून जात असतांना लक्षात ठेवण्यायोग्य बाबी ४६
३.३.१ तयारीच्या प्रक्रियेतून जात असतांना आम्ही परमेश्वरास सहकार्य देण्यास व कार्य करण्यास तयार राहावयास शिकावे ४६

३.३.२ आपला अविर्भाव महत्वाचा आहे ४६
३.३.३ जेथे सामर्थ्य आहे तेथे एकवाक्यता आहे ४६
३.३.४ जेव्हा आपण लहानसहान बाबतीत विश्वासू राहाल, तेव्हा परमेश्वर आपणास पुढील गोष्टींसाठी बढती देईल ४६
३.३.५ आत्मसंतुष्ट राहू नका. परमेश्वराने आपणास वाढवावे म्हणून त्यास मोकळीक द्या ४७
३.३.६ तयारीची वेळ कधी वाया जात नाही. जितके मोठे पाचारण, तितक्या मोठ्या तयारीची गरज भासेल ४७
३.३.७ घाई करू नका. तयारीचा काळ पूर्ण होऊ द्या. ४७
३.३.८ पाचारण व कृपादानांच्या आपल्या क्षेत्रात राहावे ४७

**४. त्याचा हेतू पूर्ण करण्यासाठी आपले स्थान ग्रहण करणे ४८**

४.१ त्याचा हेतू पूर्ण करण्यासाठी आपले स्थान ग्रहण करणे ४८
४.२ त्याची तरतूद मिळविण्यासाठी आपले स्थान ग्रहण करणे ४८
४.३ संरक्षण मिळविण्यासाठी आपले स्थान ग्रहण करणे ४९
४.४ प्रगती अथवा पदोन्नती मिळविण्यासाठी आपले स्थान ग्रहण करणे ५०

४.५ परमेश्वराचे सांप्रत संजीवन अनुभव करता यावे म्हणून आपले स्थान ग्रहण करणे ५०

४.६ जेव्हा आपण आपले स्थान ग्रहण करता, तेव्हा खालील गोष्टी लक्षात ठेवाव्या ५२

**५. उच्च पाचारणाची किंमत ५४**

५.१ रोजचे बलिदान ५५

५.२ जीवन बलिदान ५६

५.३ आत्म्याच्या मार्गदर्शनासाठी केलेले बलिदान आणि शारीरिक बलिदान ५६

**६. आपली धाव पूर्ण करणे ५८**

६.१ नियोजन ५८

६.२ अंतिम रेषेपर्यंत धावणे ६१

# परिचय

सन् १९९३ मध्ये परमेश्वराने माझ्या अंतःकरणावर एक ओझे दिले – प्रत्येक विश्वासणाऱ्यास हे दाखवून देण्याचे ओझे की परमेश्वराजवळ त्याच्या जीवनासाठी एक योजना, हेतू, स्वप्न व भवितव्य आहे. मागील वर्षांत मी हा संदेश देत राहिलो व शिकवीत राहिलो आहे की, "आपल्या जीवनासाठी परमेश्वराजवळ एक हेतू आहे." वैय्यक्तिक अभ्यास, निरीक्षण तसेच परमेश्वराच्या सेवकांनी दिलेले संदेश ऐकण्याद्वारे मला हा समज प्राप्त होत गेला की परमेश्वराची योजना कशी ओळखावी आणि परमेश्वराची योजना प्रगट करण्यासाठी व पूर्ण करण्यासाठी तो कसा आम्हास मार्गदर्शन करतो.

परमेश्वराचे लोक कशाप्रकारे हे सत्य आपल्या जीवनात आत्मसात करतात आणि कशाप्रकारे ते स्वर्गीय हेतूप्रीत्यर्थ आपले जीवन घालवितात हे पाहणे खरोखरच आनंदाची बाब आहे. "ऑल पीपल्स चर्चचा प्रत्येक विश्वासणारा सेवक आहे." आमचे ओझे विश्वासणाऱ्यांस परमेश्वराद्वारे नेमलेल्या सेवाकार्यांत मुक्त करणे व तयार करणे हे आहे. आपल्या सेवाकार्यात अशा गोष्टींचा समावेश असेल ज्या आपण मंडळीत आणि जगात करता – व्यवसायात, खेळात, शिक्षणाच्या क्षेत्रात, कला इत्यादी क्षेत्रात. आपणासाठी परमेश्वराचा हेतू मंडळीपुरता मर्यादित नाही.

पुढे जाऊन आपल्या जीवनासाठी परमेश्वराचे स्वप्न आपल्या अंतःकरणात साठवून घ्या! आपल्या जीवनासाठी परमेश्वराच्या हेतूनुसार जगण्यापेक्षा उदात्त किंवा उत्तम हेतू दूसरा कुठलाच नाही. परमेश्वराच्या स्वर्गीय पाचारणास अनुसरण्याइतके व ते पूर्ण करण्याइतके समाधान आणखी कुठल्याच गोष्टीमुळे प्राप्त होणार नाही. परमेश्वरासोबत वाटचाल करणे आणि ज्या गोष्टींची योजना त्याने आपणासाठी आखली आहे ती पूर्ण करणे यापेक्षा मोठे आणि धाडसाचे कार्य दूसरे कुठलेच नाही.

हे नेहमीच सोपे नसते. आपल्या मार्गात अनेक अडखळणे येतील ज्यांस दूर सारावे लागेल, काही दुरात्म्यांवर व लोकांवर विजय मिळवावा लागेल, जे आपल्या मार्गात अडचण आणू शकतात! परंतु यात टिकून राहा आणि आपण पाहाल की परमेश्वराचे स्वप्न आपल्यासाठी सत्य बनून राहील.

आपल्या जीवनासाठी परमेश्वराची स्वप्नाचा पाठपुरावा करतांना आपण ह्या प्रवासाचा आनंद अनुभव करा

# १

# परमेश्वराजवळ आपल्या जीवनाप्रीत्यर्थ एक हेतू आहे हे जाणून घेणे

## १.१ परमेश्वर योजना, हेतू, संकल्पना आणि लक्ष्य यांचा परमेश्वर आहे

स्तोत्र ३३:११
**परमेश्वराची योजना सर्वकाळ टिकते; त्याच्या मनांतील संकल्प पिढ्यानपिढ्या कायम राहतात.**

परमेश्वर योजना, हेतू, संकल्पना आणि लक्ष्य यांचा परमेश्वर आहे. परमेश्वर वाटेल त्याप्रकारे काम करीत नाही.

प्रेषितांची कृत्ये १५:१८
**हे जे त्याला युगादिपासून माहीत आहे ते करणारा प्रभु असे म्हणतो.**

यशया ४६:१०
**मी आरंभीच शेवट कळवितो. होणाऱ्या गोष्टी घडविण्यापूर्वी त्या मी प्राचीन काळापासून सांगत आलो आहे; माझा संकल्प सिद्धीस जाईल, माझा मनोरथ मी पूर्ण करीन.**

परमेश्वर आरंभीच शेवट जाणतो. तो आरंभापासूनच प्रवासाचा कोठे अंत होईल ते जाणतो आणि तेथे कसे जावे हेही तो जाणतो.

## १.२ परमेश्वराजवळ एक हेतू आहे – 'सामान्य हेतू' किंवा 'मास्टर प्लान,' जो तो ह्या पृथ्वीतलावर पूर्ण करीत आहे

इफिस १:९-१२

**९ खिस्ताच्या ठायी पूर्वी केलेल्या योजनेप्रमाणें त्यानें स्वतःच्या इच्छेनुरुप स्वसंकल्पाचें रहस्य आपल्याला कळविलें; १० ती योजना अशी कीं, कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था लावितांना स्वर्गांत व पृथ्वीवर जें आहे तें सर्व खिस्तामध्यें एकत्र करावे. ११ आपल्या मनाच्या संकल्पाप्रमाणें जों अवघें चालवितो त्याच्या योजनेप्रमाणें आम्ही पूर्वीं नेमिलेले असून खिस्ताच्या ठायीं वतनदार झालों आहों; १२ ह्यासाठीं कीं, ज्या आम्हीं खिस्तावर पूर्वीच आशा ठेविली होती, त्या आम्हांकडून त्याच्या गौरवाची स्तुति व्हावी.**

इफिस ३:११

**ह्यास्तव मी विनंती करितों कीं, तुम्हांप्रीत्यर्थ मला होणाऱ्या क्लेशांमुळें तुम्हीं खचूं नये; ते तुम्हांस भूषणावह आहेत.**

एक सनातन हेतू आहे जो परमेश्वर पृथ्वीवर प्रकट करीत आहे व अमलात आणीत आहे. यास आम्ही परमेश्वराचा 'मास्टर प्लान' (प्रमुख योजना) म्हणतो जो तो आज ह्या पृथ्वीतलावर पूर्ण करीत आहे.

परमेश्वराचा मास्टर प्लान लोकांस तारणाच्या अनुभवाप्रत आणणे हा आहे, जेणेकरून त्यांस सत्याचे ज्ञान प्राप्त व्हावे आणि त्यांनी त्याचा पुत्र प्रभू येशू ख्रिस्त ह्याची समानता प्राप्त करावी.

१ तीमथ्य. २:३,४

**३ हे आपला तारणारा देव ह्यांच्या दृष्टीने चांगले व स्वीकारावयास योग्य आहे. ४ त्याची अशी इच्छा आहे कीं, सर्व माणसांचे तारण व्हावें व त्यांनी सत्याच्या परिपूर्ण ज्ञानाप्रत पोहंचावें.**

## १.३ परमेश्वराजवळ आणणासाठी एक हेतू आहे – 'एक विशिष्ट योजना'

स्तोत्र १३९:१६
**मी गर्भात पिंडरूपानें असतांना तुझ्या नेत्रांनी मला पाहिलें, आणि माझा एकही दिवस उगवण्यापूर्वी ते सर्व तुझ्या वहीत नमूद करून ठेवले होते.**

स्तोत्र १३९:१६ (मेसेज बाइबल)
**उघड्या पुस्तकासमान, तू मला गर्भधारणेच्या समयापासून जन्मापर्यंत वाढतांना पाहिलेस; माझ्या जीवनाच्या सर्वच अवस्था तुजपुढे प्रगट होत्या. एक दिवस जीवन जगण्यापूर्वीच माझ्या जीवनाचे दिवस तुजपुढे तयार होते.**

परमेश्वराजवळ आपल्या जीवनाचा अन्तिम आराखडा (ब्लू प्रिन्ट) आहे. परमेश्वराजवळ  आपल्या जीवनासाठी एक स्वप्न आहे.

त्याने एका हेतूने आपणास रचले आहे. त्याने आपणास यासाठी घडविले की आपण त्याचा हेतू पूर्ण करण्यायोग्य बनावे, जो त्याच्या मनात आपल्याप्रीत्यर्थ आहे.

फिलिपै. ३:१२
**एवढ्यांतच मीं मिळविलें, किंवा एवढ्यांतच मी पूर्ण झालों आहें असें नाहीं तर ज्यासाठीं ख्रिस्त येशूनें मला आपल्या कह्यांत घेतलें तें मीं आपल्या कह्यांत घ्यावें म्हणून मी त्याच्या मागें लागतों आहे.**

या ठिकाणी 'ज्यासाठी' आहे – ज्यासाठी येशू ख्रिस्ताने आम्हास कह्यात घेतले आहे. आपणासाठी त्याच्याजवळ एक योजना आहे, हेतू आहे!

इफिस २:२०
**प्रेषित व संदेष्टे ह्या पायावर तुम्ही रचिलेले आहां; स्वतः ख्रिस्त येशू मुख्य कोनशिला आहे.**

काही ‘सत्कृत्ये’ परमेश्वराने आपणासाठी आधीच तयार केली आहेत की आपण ती पृथ्वीवर पूर्ण करावीत.

काही ठिकाणे आहेत जेथे परमेश्वरास वाटते की आपण जावे; काही लोक आहेत ज्यांच्या जीवनास आपण स्पर्श करावा; काही जीवनांस आपण प्रभावित करावे; काही कामे आपणास पूर्ण करावयाची आहेत; शहरास बदलून टाका, राष्ट्रांस हादरून सोडा!

जीवन जगणे सोपे आहे - परमेश्वराने आपल्या जीवनासाठी काय योजना आखली आहे ते जाणून घ्यावे, त्यानुसार चालावे!

परमेश्वराने आपणास “आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे” पाचारण केले आहे. आपणास त्याचा हेतू पूर्ण करावयासाठी, परमेश्वरासोबत सहभागी होण्यासाठी पाचारण करण्यात आले आहे. हे एक अद्भुत सत्य आहे. आम्ही आपला हेतू पूर्ण करावयासाठी जगत नाही - तर एका उच्च हेतूसाठी जगत आहोत - “त्याच्या हेतूप्रीत्यर्थ अथवा त्याच्या मनाच्या सत्संकल्पासाठी!”

त्याचा हेतू पूर्ण करण्यासाठी त्याच्या हेतूसमवेत त्याची कृपा असते. आपल्या दैवी पाचारणासोबत तो आम्हास दैवी अधिकार देतो. त्याचा हेतू व कृपा ही आम्हास “ख्रिस्त येशूमध्ये” लाभली आहेत. जेव्हा आम्ही ख्रिस्ताजवळ येतो, तेव्हाच केवळ त्याचा हेतू पूर्ण करण्यासाठी परमेश्वराचे भागीदार होण्याच्या स्थितीत असतो.

आमच्यासाठी परमेश्वराची विशिष्ट योजना त्याच्या मास्टर प्लानचा एक भाग आहे. जेव्हा आपण आपल्या जीवनासाठी परमेश्वराचा विशिष्ट हेतू पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल, तेव्हाच आपण पृथ्वीवर परमेश्वराचा सामान्य हेतू पूर्ण करण्यात सहाय्यक ठराल

## १.४ आमच्यासाठी परमेश्वराची योजना नेहमीच उत्तम असते!

यिर्मया २९:११

**परमेश्वर म्हणतो, तुम्हांविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो; ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत; ते तुम्हांस तुमच्या भावी सुस्थितीचे आशा देणारे आहेत.**

रोम ८:२८

**परंतु आपल्याला ठाऊक आहे कीं, देवावर प्रीति करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणें बोलाविलेल्यांस देवाच्या करणीनें सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात.**

आपल्या मनात दृढ विश्वास असू द्या. आपल्यासाठी परमेश्वराची योजना उत्तम आहे!

परमेश्वर आपल्या बाजूस आहे, आपल्या विरोधात नाही. आपल्यासाठी त्याची योजना नेहमीच उत्तम आहे - आपल्या 'शालोम' (कल्याण, आरोग्य, समृध्दी, यश, शांती) साठी आहे. आपल्यासाठी परमेश्वराच्या योजनेपेक्षा उत्तम असे दुसरे काहीच नाही!

## १.५ परमेश्वराची योजना पूर्ण करण्यासाठी आम्हास त्यास सहकार्य करावे लागेल

१ करिंथ ३:९

**कारण आम्ही देवाचे सहकारी आहों; तुम्ही देवाचें शेत, देवाची इमारत असे आहां.**

आमच्या जीवनासाठी परमेश्वराची योजना आपोआप पूर्ण होणार नाही. आमच्या जीवनासाठी परमेश्वराची योजना पूर्ण करण्यासाठी आम्हास परमेश्वराशी सहकार्य केले पाहिजे. आमच्या जीवनासाठी परमेश्वराची योजना व हेतूचे पूर्ण होणे आमच्यावर अवलंबून आहे. काही लोक परमेश्वराच्या योजनेनुसार कार्य करण्यास सुरूवातच करीत नाहीत. काही लोक त्याच्या योजनेची एक लहानशी

टक्केवारी पूर्ण करतात. पवित्र बायबल म्हणते की पौलाने "आपली धाव पूर्ण केली."

परमेश्वर स्वर्गात आपली इच्छा प्रगट करतो. परंतु पृथ्वीवर आपला हेतू पूर्ण करण्यासाठी तो आपल्या लोकांकडे अपेक्षेने पाहतो.

## १.६ आपल्या जीवनासाठी परमेश्वराच्या योजना शोधणे आणि त्यांचे अनुसरण करणे

हे जरूरी नाही की आमच्या जीवनासाठी परमेश्वराची योजना व हेतू गूढ असावा!

काही लोकांचे हे मत आहे की परमेश्वराची इच्छा इतकी रहस्यपूर्ण आहे की आम्हास ती कळून येत नाही! परंतु हे पूर्णपणे असत्य आहे!

आपली इच्छा प्रगट करण्यासाठी परमेश्वर - आमच्या जीवनात त्याची योजना व हेतू प्रगट करण्यास इच्छुक आहे - जर आम्ही त्याचा धावा करावयास तयार आहोत तर.

आम्ही 'नऊ मार्गदर्शक स्तम्भांविषयी शिकणार आहोत जे आमच्या जीवनासाठी परमेश्वराचे मार्गदर्शन व निर्देश ओळखण्यात आमची मदत करतील.

- परमेश्वराच्या वचनाची संपूर्ण शिकवण व मार्गदर्शन ओळखणे.
- आपल्या जीवनातील 'बीजांस' ओळखणे.
- आपल्या अंतःकरणाची उत्साह ओळखणे.
- आपणास देण्यात आलेली परमेश्वराची कृपा ओळखणे.
- परिस्थिती ओळखणे.
- परमेश्वराच्या आत्म्याचे मार्गदर्शन ओळखणे.

- ईश्वरीय बुद्धी व संकल्प ओळखणे.
- कालप्रवृत्ती ओळखणे.
- आपल्या जीवनात कार्य करण्याची परमेश्वराची पद्धत ओळखणे.

## १.७ परमेश्वराची योजना व हेतू पूर्ण करण्यासाठी परमेश्वर आपणास तयार करील.

आपली तयारी जितकी पूर्ण असेल, तितकेच आपले यश शक्य होईल.

तयारीची वेळ कधी व्यर्थ जात नाही.

पाचारण जेवढे मोठे असेल, तेवढ्याच मोठ्या तयारीची गरज आहे.

## १.८ आम्ही चुका करतो - परंतु आमच्या अपयशावर विजय मिळविण्यासाठी आणि त्याचे पाचारण पूर्ण करावयास परमेश्वर आमचे सहाय्य करू शकतो.

ज्या दुर्बळतेवर आपण विजय मिळवू शकत नाही, तिचा उपयोग सैतान आपल्या विरोधात उपयोग करील.

परमेश्वर वेळेपेक्षा मोठा आहे. परमेश्वर आमच्या चुकांपेक्षा मोठा आहे.

२ तीमथ्य. ४:६-८

**[६] कारण आतां माझें अर्पण होत आहे, आणि माझा प्रयाणकाळ जवळ आला आहे. [७] जें सुयुद्ध तें मीं केलें आहे, धाव संपविली आहे, विश्वास राखिला आहे; [८] आतां जें राहिलें तें हेंच कीं, माझ्यासाठीं नीतिमत्त्वाचा मुकुट ठेविला आहे; प्रभु जो नीतिमान् न्यायाधीश आहे तो त्या दिवशीं मला तो मुकुट देईल; आणि तो केवळ मलाच नव्हे, तर त्याचें प्रगट होणें ज्यांना प्रिय झालें त्या सर्वांनाहि देईल.**

प्रेषित पौल जवळजवळ पस्तीस वर्षांचा असतांना प्रभू येशूजवळ आला, तरीही त्याने म्हटले की मी आपली धाव पूर्ण केली आहे. परमेश्वराचे पाचारण पूर्ण करण्यासाठी वयाची अडचण येत नाही.

२ तीमथ्य. १:९

**त्यानें आमच्या कृत्यांप्रमाणें नव्हे स्वतःच्या संकल्पाप्रमाणें व कृपेप्रमाणें आम्हांला तारिलें व पवित्र पाचारणानें पाचारिलें आहे; ही कृपा युगांच्या काळापूर्वी ख्रिस्त येशूच्या ठायीं आपल्यावर करण्यांत आली होती.**

परमेश्वर सिद्ध पात्रांच्या शोधात नाही. तो समर्पित पात्रांच्या शोधात आहे.

२ करिंथ ४:७

**ही आमची संपत्ति मातीच्या भांड्यात आहे, अशा हेतूनें कीं, सामर्थ्याची पराकोटी देवाची आहे, आमच्यापासून होत नाहीं, हें समजावें.**

हे आमच्याद्वारे कार्य करणारे परमेश्वराचे सामर्थ्य आहे. आम्ही मातीची भांडी आहोत.

## १.९ परमेश्वराचा हेतू पूर्ण करण्यासाठी सैतान आम्हास थांबविण्याचा पूर्ण प्रयत्न करील.

परमेश्वराद्वारे देण्यात आलेले स्वप्न नेहमी दुरात्म्यांच्या विरोधाचा सामना करील.

उशीर नेहमीच परमेश्वराकडून नसतो (दानीएल १०:२-१४). सैतान आमच्या चमत्कारांत उशीर करण्याचा प्रयत्न करतो आणि अशाप्रकारे परमेश्वराच्या सर्वोच्च व सर्वोत्तम योजनेप्रत पोहोचण्याची आमची इच्छा तो कमकुवत करतो.

## १.१० आम्हास परमेश्वराच्या पाचारणाकडे आपले लक्ष दिले पाहिजे

चित्त विचलीत होणे - जेव्हा आमचे लक्ष विचलीत होते, त्याचा परिणाम म्हणून आमचा वेळ व शक्ती नष्ट होते. परमेश्वराने म्हटले आहे, “तू डावीउजवीकडे वळू नको; दुष्कर्मांतून आपले पाऊल काढ” (नीतिसूत्रे ४:२७).

## १.११ आमच्यात धैर्य असले पाहिजे

विजयाची रुची आमच्या संघर्षापलीकडे टिकून राहते (माईक मर्डोक).

आपल्या धैर्यामुळे सैतानाचे मनौर्धर्य खचून जाते (माईक मर्डोक).

# २

# आपल्या जीवनासाठी परमेश्वराचा हेतू ओळखणे

इफिस ५:१५-१७

**१५ ह्यास्तव अज्ञान्यांसारिखे नव्हे तर ज्ञान्यांसारिखे सभोंवार नजर ठेवून जपून चाला. १६ वेळेचा सदुपयोग करा, कारण दिवस वाईट आहेत. १७ म्हणून तुम्ही मूर्खांसारिखे होऊं नका, तर प्रभूची इच्छा काय आहे हें समजून घ्या.**

पवित्र शास्त्र आम्हास सांगते की आम्ही प्रभूची इच्छा जाणून घ्यावी.(मानसिकरित्या समजून घ्यावी).

प्रभूची इच्छा काय आहे ते आम्हास कळते!

कलस्सै १:९-११

**९ ह्यावरून आम्हीहि तें ऐकल्या दिवसापासून तुम्हांसाठी खंड पडूं न देंता प्रार्थना करून मागतों कीं, सर्व आध्यात्मिक ज्ञान व बुद्धि ह्यांच्याद्वारे तुम्हीं त्याच्या इच्छेसंबंधीच्या पूर्ण ज्ञानानें भरलें जावें; १० अशा हेतूने कीं, तुम्ही सर्वप्रकारें प्रभूला संतोषविण्याकरितां त्याला शोभेल असें वागावें, म्हणजें प्रत्येक प्रकारच्या सत्कार्यांचें फळ द्यावें आणि देवाच्या पूर्ण ज्ञानानें तुमची वृद्धि व्हावी; ११ सर्व प्रकारचा धीर व सहनशक्ति हीं तुम्हांस आनंदासह प्राप्त व्हावीं म्हणून त्याच्या गौरवाच्या पराक्रमानुसार तुम्हीं सर्व प्रकारच्या सामर्थ्यानें समर्थ व्हावें.**

त्याच्या इच्छेच्या ज्ञानाने युक्त होणे शक्य आहे. आमच्यापैकी कोणासही आमच्या जीवनासाठी त्याच्या इच्छेसंबंधाने “अंधारात राहण्याची” गरज नाही.

त्याची इच्छा जाणून घेण्यासाठी बुद्धी व आध्यात्मिक समजेची गरज आहे.

त्याची इच्छा जाणून घेतल्यानंतर आपण,

- त्यास अनुरूप असे जीवन जगू शकता.
- त्यास प्रसन्न करणारे जीवन घालवू शकता.
- प्रत्येक चांगल्या कामात यशस्वी होऊ शकता.
- त्याच्या ज्ञानात वाढू शकता.

१ करिंथ २:९,१०

**[९] हें तर ह्या शास्त्रलेखाप्रमाणें आहेः 'डोळ्यानें जे पाहिलें नाहीं, कानानें जें ऐकलें नाहीं' व माणसाच्या 'मनांत जें आलें नाहीं, तें आपणावर प्रीति करणाऱ्यांसाठीं देवानें' सिद्ध केलें आहे; [१०] कारण देवानें तें आत्म्याच्या द्वारें आपल्याला प्रगट केलें, कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा व देवाच्या गहन गोष्टींचाहि शोध घेतो.**

परमेश्वराने त्याचे लोक म्हणून व व्यक्तीच्या रूपात आमच्यासाठी काही गोष्टींची योजना आखलेली आहे. पवित्र आत्मा ती आम्हावर प्रगट करील.

१ करिंथ २:१६

**'प्रभूचें मन असें कोणीं ओळखिले आहे कीं त्यानें त्याला शिकवावें?' आपल्याला तर ख्रिस्ताचें मन आहे.**

आत्म्याच्या प्रगटीकरणाच्या कार्यामुळे आमच्यात ख्रिस्ताचे मन आहे. आम्ही ख्रिस्ताचे विचार, योजना व हेतू काय आहेत ते जाणतो.

आमच्या जीवनासाठी परमेश्वराची योजना व हेतू आपण बिनचूकपणे, पूर्णपणे व स्पष्टपणे जाणू शकता.

आपणास अशा आंधळ्याप्रमाणे आपल्या जीवनात चाचपडत चालण्याची गरज नाही, जो परमेश्वराची योजना व हेतू याविषयी पूर्णपणे अपरिचित आहे. आपण प्रभूची इच्छा समजू शकता, स्वतःस त्याच्या इच्छेसंबंधीच्या पूर्ण ज्ञानाने

भरू शकता. त्याने ज्या गोष्टी आपणासाठी तयार केल्या आहेत त्याविषयी जाणू शकता. आपण “ख्रिस्ताच्या मनाप्रमाणे” चालू शकता.

नीतिसूत्रे ४:१८

**परंतु धार्मिकांचा मार्ग मध्यान्हापर्यंत उत्तरोत्तर वाढणाऱ्या उदयप्रकाशासारखा आहे.**

अनेक बाबतीत आमच्या जीवनासाठी परमेश्वराची योजना व हेतूचे प्रगटीकरण उत्तरोत्तर असते.

इब्री ११:८

**अब्राहामाला पाचारण झाल्यावर जें ठिकाण त्याला वतनादाखल मिळणार होते तिकडे ‘निघून जाण्यास तो विश्वासाने मान्य झाला; आणि आपण कोठें जातो हे ठाऊक नसतांहि तो निघून गेला.**

जे पाऊल आपण उचलावे अशी परमेश्वराची इच्छा आहे, त्यात जेव्हा आपण परमेश्वराच्या आज्ञेचे पालन कराल, तेव्हा तो योग्य वेळी पुढील पाऊल प्रगट करील.

उत्पत्ती २४:२७

**तो म्हणाला, माझा धनी अब्राहम याचा देव परमेश्वर धन्यवादित आहे; त्याने माझ्या धन्यावर दया करण्याचे व त्याजशी सत्यतेने वर्तण्याचे सोडिले नाही; परमेश्वराने मला नीट वाट दाखवून माझ्या धन्याच्या भावांच्या घरी पोंचविले आहे.**

जेव्हा आम्ही मार्गावर पुढे वाढतो – परमेश्वर ज्या दिशेने आम्हास नेऊ इच्छितो त्या दिशेने जेव्हा आम्ही जातो – तेव्हा प्रभू आम्हास आपल्या योजनेत व हेतूमध्ये पुढे वाढवितो.

आम्ही आमच्या जीवनाकरिता परमेश्वराची योजना व हेतू कसा ओळखतो? आपण नऊ मार्गदर्शक स्तंभाची चर्चा करू या जी आम्हास सहाय्यक ठरतील.

वेगवेगळ्या वेळी परमेश्वर यापैकी एक अथवा त्यापेक्षा अधिक मार्गदर्शक स्तंभांचा उपयोग करून, ज्या मार्गाने आम्हास गेले पाहिजे असे त्याला वाटते, त्या मार्गाने आमचे मार्गदर्शन करील.

- परमेश्वराच्या वचनाची संपूर्ण शिकवण व मार्गदर्शन ओळखणे.
- आपल्या जीवनातील 'बीजांस' ओळखणे.
- आपल्या अंतःकरणाचा उत्साह ओळखणे.
- आपणास देण्यात आलेली परमेश्वराची कृपा ओळखणे.
- परिस्थिती ओळखणे.
- परमेश्वराच्या आत्म्याचे मार्गदर्शन ओळखणे.
- ईश्वरीय बुद्धी व संकल्प ओळखणे.
- समय व वेळ ओळखणे.
- आपल्या जीवनात कार्य करण्याची परमेश्वराची पद्धत ओळखणे.

## २.१ परमेश्वराच्या वचनांची शिकवण व निर्देश ओळखणे

२ तीमथ्य. ३:१६,१७

**प्रत्येक परमेश्वरप्रेरित शास्त्रलेख सद्बोध, दोष दाखविणे, सुधारणूक, नीतिशिक्षण ह्याकरिताउपयोगी आहे. ह्यासाठी की, देवाचा भक्त पूर्ण होऊन प्रत्येक चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा.**

आमच्या जीवनाकरिता परमेश्वराचे मार्गदर्शन व दिग्दर्शन नेहमी परमेश्वराच्या लिखित वचननुसार असेल.

रोम १२:२

**देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहें हें तुम्ही समजून घ्यावें, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊं नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणानें स्वतःचें रूपांतर होऊं द्या**

'समजून घ्यावे' *dokimazo* (ग्रीक) या शब्दाचा अर्थ आहे

पडताळणे-*dokimazo* हा शब्द सामान्यतः धातूचे परीक्षण करण्याच्या प्रक्रियेसाठी, आगीत तापविण्याच्या प्रक्रियेसाठी उपयोग केला जातो. याचा अर्थ आहे शोधणे, विचार करणे, निश्चित ठरविणे हा होतो. या ठिकाणी याचा अर्थ हाच आहे. याचा अर्थ हा आहे की परमेश्वराची इच्छा यशस्वीरित्या जाणून घेण्यासाठी नविनीकरण प्राप्त बुद्धीची गरज आहे.

अर्थ हा आहे की मनाचे नविनीकरण हे परमेश्वराची इच्छा यशस्वीरित्या जाणून घेण्यासाठी जरूरी आहे. मनाचे नविनीकरण देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे पारखण्यासाठी अगत्याचे आहे.

हे वचन असे शिकवत नाही की परमेश्वराजवळ त्याच्या इच्छेचे तीन वर्ग आहेत. त्याची इच्छा एक तर असेल, नाही तर नसेल. परमेश्वराची इच्छा उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण अशी आहे.

उत्तम म्हणजे उत्कृष्ट, सरळ व आदरणीय.

ग्रहणीय म्हणजे पूर्णतः अनुकूल, जी परमेश्वरास प्रसन्न करणारी असेल, जी त्याला आवडेल.

परिपूर्ण म्हणजे सिद्ध ज्यात कुठलाही दोष किंवा उणीव नाही.

जी गोष्ट उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण आहे, ती त्याची इच्छा आहे.

नविनीकरण प्राप्त मन लवकरच पडताळा करू शकते (विश्लेषण करणे, सिद्ध करणे, ओळखणे) की एखादी गोष्ट उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण आहे किंवा नाही व त्याद्वारे हे ठरविते की ती परमेश्वराची इच्छा आहे काय.

इफिस ५:१० 'पारखून घेणे' *dokimazo* (ग्रीक) या शब्दाचा अर्थ आहे पडताळा करणे.

एखादी गोष्ट परमेश्वरास प्रसन्न करणारी आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी जी मुख्य कसोटी आम्ही उपयोगात आणतो ती आहे – ती परमेश्वराच्या वचनानुसार आहे काय.

इब्री ५:१४
**पण ज्यांच्या ज्ञानेंद्रियांना वहिवाटीनें चांगलें आणि वाईट समजण्याचा सराव झाला आहे अशा प्रौढांसाठीं जड अन्न आहे.**

परमेश्वराच्या वचनाचा निरंतर उपयोग करून आपण आपल्या ज्ञानेन्द्रियांस प्रशिक्षित करतो की आम्हास बऱ्या व वाईटामधील फरक सहजपणे समजून यावा.

म्हणूनच परमेश्वराचे वचन सतत वाचत राहणे व परमेश्वराच्या वचनास आमच्या जीवनाचा महत्वपूर्ण भाग बनविणे महत्वाचे आहे.

## व्यवहारिक जीवनातील उदाहरण

## विवाह

उत्पत्ती २:२४
**यास्तव पुरुष आपल्या आईबापांस सोडून आपल्या स्त्रीशी जडून राहील; ती दोघे एकदेह होतील.**

२ करिंथ ६:१४,१५
**[१४] तुम्हीं विश्वास न ठेवणाऱ्यांबरोबर संबंध जोडून विजोड होऊं नका; कारण नीति व स्वैराचार ह्यांची भागी कशी होणार? उजेड व अंधार ह्यांचा मिलाफ कसा होणार? [१५] ख्रिस्ताची बलियाराशीं एकवाक्यता कशी होणार? विश्वास ठेवणारा व विश्वास न ठेवणारा हे वांटेकरी कसे होणार?**

आमोस ३:३
**पूर्वसंकेत केल्याशिवाय दोघे जण एकमेकांबरोबर चालतील काय?**

परमेश्वराची इच्छा ही आहे की आपण विश्वासणाऱ्याबरोबर लग्न करावे.

## घटस्फोट

मलाखी २:१६

**परमेश्वर इस्राएलचा देव म्हणतो, मला सुटपत्राचा तिटकारा आहे; सेनाधीश परमेश्वर म्हणतो, जो आपल्या पत्नी बरोबर क्रूरतेने वागतो त्याचा मी द्वेष करितो; तर तुम्ही आपल्या आत्म्यास जपा, विश्वास घाताने वागूं नका.**

परमेश्वरास घटस्फोट अथवा सूटपत्राचा वीट आहे.

## अनीतिपूर्ण कामे

इफिस ४:२८

**चोरी करणाऱ्यानें पुन्हा चोरी करूं नये; तर त्यापेक्षां गरजवंताला द्यावयास आपल्याजवळ कांही असावें म्हणून जें चांगलें ते आपल्या हातांनीं करून उद्योग करीत राहावेंण**

स्तोत्र २३:३

**तो माझा जीव ताजवताना करितो; तो आपल्या नावासाठी मला नीतिमार्गांनी चालवितो.**

परमेश्वर चांगले काम करण्यासाठी आपणास पाप करावयास प्रवृत्त करणार नाही.

## २.२ आपल्या जीवनाचे 'बीज' ओळखणे

मार्क ४:२६-३२

**[२६] आणखी तो म्हणाला, परमेश्वराचें राज्य असे आहे कीं, जणूं काय एखादा**
**माणूस जमिनींत बीं टाकतों, रात्रीं झोपीं जातो, दिवसां उठतो, [२७] आणि तें बीं**
**रुजतें व वाढतें पण हें कसें होते हें त्याला कळत नाहीं. [२८] जमीन आपोआप**
**पीक देते; पहिल्यानें अंकुर, मग कणीस, मग कणसांत भरलेला दाणा. [२९] पीक**

**तयार झाल्यावर तो लागलाच 'विळा घालतो, कारण कापणीची वेळ आली आहे.' [३०] आणखी तो म्हणाला, आपण देवाच्या राज्यास कशाची उपमा द्यावी अथवा कोणत्या दाखल्यांत तें मांडावें? [३१] तें मोहरीच्या दाण्यासारखें आहे. तो जमिनींत पेरतेवेळीं पृथ्वीवरील सर्व दाण्यांमध्यें जरी बारीक असला. [३२] तरी पेरल्यावर उगवून सर्व झाडपाल्यांमध्यें मोठा होतो आणि त्याला अशा मोठमोठ्या फांद्या फुटतात कीं 'आकाशांतील पांखरांस त्याच्या सांवलींत वस्ती करतां येते.**

परमेश्वर आपल्या "बीज सिद्धांतानुसार" कार्य करतो.

आपण "बीज" या शब्दाचा उपयोग लहानपणापासून आपल्या जीवनात पेरण्यात आलेल्या गोष्टींचा उल्लेख करण्यासाठी करतो - नंतर आपणाद्वारे करण्यात आलेल्या कित्येक निवडींवर व निर्णयांवर त्याचा प्रभाव होत आला.

'बीज' लहानपणातच विशेष गुण अथवा आवडीनिवडी ओळखणे असू शकते. काही विशेष संधी जी आपल्या जीवनात अगदी प्रारंभीच्या वर्षात प्राप्त होतात. इतर बीज आपल्या संपर्कात येणारे, परमेश्वराद्वारे आपल्या जीवनात आणलेले लोक, स्वप्न, भविष्यवाणीचा संदेश इत्यादी असू शकतात.

**उदाहरण :**

***योसेफ*** **- लहानपणापासूनच योसेफाने हे स्वप्न पाहिले होते की त्याचे भविष्य पुढे काय असेल. (उत्पत्ती ३७).**

***मोशे*** **- परमेश्वराने अलौकिकरित्या फारोच्या राजदरबारात मोशेला शिक्षण व प्रशिक्षण मिळवून देण्याची व्यवस्था केली.मोशेच्या जीवनात हे परमेश्वराच्या 'आध्यात्मिक भवितव्याचे बीज' होते (प्रेषितांची कृत्ये ७:२२).**

***दावीद*** **- संदेष्टा शमूवेल याने बालपणातच दाविदाचा राज्याभिषेक केला (१ शमूवेल १६:१३). बालपणात दाविदास एक कुशल संगीतकार, बलवान योद्धा, आपल्या मार्गात बुद्धिवान व सुंदर व्यक्तीच्या रूपात ओळखले जाऊ लागले (१ शमूवेल १६:१८). ह्या 'बीजांनी' दाविदास**

**घडविले. जे काही दावीद बनला, जे काही त्याने आपल्या जीवनात साध्य केले ते ह्या बीजांद्वारे.**

***एस्तेर* - एस्तेरचे सौंदर्य तिचे 'बीज' होते ज्यामुळे ती राणी बनण्यास पात्र ठरली. यहूदी लोकांसाठी ह्या बीजाने तिला एक प्रभावी स्त्री म्हणून स्थान मिळवून दिले.**

आपल्या जीवनात 'आध्यात्मिक भवितव्याचे बीज' ओळखा.

आपल्या जीवनाचे बीज परमेश्वराची योजना, हेतू व दिग्दर्शन याबद्दल आपणास संदेश देत आहे.

## २.३ आपल्या अंतःकरणातील हालचाल ओळखणे

नहेम्या १:१-४

**१ हखल्याचा पुत्र नहेम्या याचा वृतांत विसाव्या वर्षी किसलेव महिन्यात मी शूशन राजवाड्यात होतो. २ तेव्हा हनानी नांवाचा माझा एक बांधव आणि इतर कांही लोक यहूदांतून आले; बंदिवासांतून सुटलेल्यापैकी जे यहूदी शेष राहिले होते त्यांच्या विषयी व यरूशलेमविषयी त्यांजकडे मी पुसतपास केला. ३ त्यांनी मला सांगितले, बंदिवासांतले जे अवशिष्ट लोक त्या प्रांतांत राहिले ते मोठ्या दुर्दशेत असून त्यांची अप्रतिष्ठा होत आहे ४ हे ऐकतांच मी खाली बसून रडू लागलो आणि बरेच दिवसपर्यंत विलाप करीत राहिलो; मी उपास करून स्वर्गीच्या देवाची प्रार्थना केली की,**

नहेम्या २:१२

**मी रात्रींचा उठून थोडीशी माणसे बरोबर घेतली; यरूशलेमेसंबंधाने काय करावे याविषयी माझ्या देवाने माझ्या मनांत घांतलेला विचार मी कोणा मनुष्यास सांगितला नाही, आणि माझ्या बसवयाच्या पाठाळाखेरीज माझ्याबरोबर दुसरे कोणतेहि जनावर नव्हते.**

नहेम्याप्रमाणे बहुधा बंदिवासात असे अनेक जण असतील ज्यांनी

यरूशलेमाच्या दुर्दशेविषयी ऐकले असेल. परंतु जेव्हा नहेम्याने यरूशलेमेच्या तटबंदीविषयी ऐकले तेव्हा त्याच्या अंतःकरणात अस्वस्थता, खळबळ माजली. त्याच्या अंतःकरणात अशी खळबळ माजली ज्याने त्यास नगराच्या भिंतीची पुन्हा उभारणी करावयास प्रवृत्त केले.

नहेम्याने ओळखले की परमेश्वराने हा विचार त्याच्या अंतःकरणात घातला आहे. कित्येकदा आमच्या जीवनात परमेश्वराचे मार्गदर्शन आमच्या अंतःकरणातील सतत, आग्रही व सखोल हालचालीद्वारे घडून येते.

एखाद्या गोष्टीबद्दल भावूक होण्यापेक्षा हे फार अधिक आहे. भावनात्मक खळबळ हवामानासारखी असते – तिच्यात बदल घडून येतो. परंतु स्वर्गातून जी हालचाल सुरू होते, ती सखोल असते. ती कायमची असते, ती पुन्हा पुन्हा येत राहते व तिची मागणी असते की कार्य पूर्ण झाले पाहिजे!

प्रेषितांची कृत्ये १७: १६,१७

**१६ पौल अथेनैस त्यांची वाट पाहत असतां, तें शहर मूर्तींनीं भरलेलें आहे असें पाहून त्याच्या मनाचा संताप झाला. १७ ह्यामुळें तो सभास्थानांत यहूद्यांबरोबर व भक्तिमान् लोकांबरोबर आणि बाजारांत जे त्याला आढळत त्यांच्याबरोबर दररोज वाद घालीत असे**

प्रेषितांची कृत्ये १८:५

**सीला व तीमथ्य हे मासेदोनियाहून आले तेव्हां, येशू हाच ख्रिस्त आहे, अशी यहूद्यांना साक्ष देऊन वचन सांगण्यांत पौल गढून गेला होता.**

अन्तर्मनातील वेगवेगळ्या भावनांवर लक्ष द्या ज्याद्वारे जागृत केल्याचा, उत्सुकतेचा व बाध्य केल्याचा अनुभव होतो. अशाप्रकारच्या अन्तर्मनातील भावनांचा उदय परमेश्वराच्या अंतःकरणात होतो - जेव्हा आपणास तोच अनुभव होतो जो त्याला होतो, ते७व्हा आपणास आपल्या हाती स्वर्गाची नाडी येते आणि आपण कार्यप्रवृत्त होतो.

## २.४ परमेश्वराने दिलेली कृपा ओळखणे

### २.४.१ नवीन करारात ”कृपा“ शब्द दाखवितो

#### २.४.१.१ दैवी कृपा

इफिस २:८

**कारण कृपेनेंच विश्वासाच्या द्वारें तुमचें तारण झालेलें आहे आणि हें तुमच्या हातून झालें असें नाहीं, तर हें देवाचें दान आहे.**

#### २.४.१.२ दैवी चारित्र्य

२ पेत्र ३:१८

**आणि आपला प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त ह्याच्या कृपेंत व ज्ञानांत वाढत जा.**

#### २.४.१.३ दैवी समर्थता

इफिस ४:७

**तरी आपणांपैकीं प्रत्येकाला ख्रिस्तानें दिलेल्या दानाच्या परिमाणाप्रमाणें अनुग्रहरूपी देणगी प्राप्त झाली आहे.**

एकच दानाची वेगवेगळी परिमाणे असू शकतात.

रोम १२:४-६

**[४] कारण जसें आपणांला एक शरीर असून त्यांत पुष्कळ अवयव आहेत, तरी त्या सर्व अवयवांचें कार्य एकच नाहीं. [५] तसें आपण पुष्कळ जण असून ख्रिस्तामध्यें एक शरीर आणि प्रत्येक जण एकमेकांचे अवयव असें आहों. [६] आपल्याला प्राप्त झालेल्या कृपादानांप्रमाणें आपल्याला निरनिराळीं कृपादानें आहेत, म्हणून ईश्वरी संदेश सांगावयाचा असल्यास आपण तो आपल्या विश्वासाच्या प्रमाणानें सांगावा,**

- आपल्या जीवनातील कृपादाने आपणास देण्यात आलेल्या कृपेचे सूचक आहेत.

- परमेश्वराने आपणास त्याच्या देहात करावयाची जी कार्ये नेमून दिलेली कार्ये आहेत, त्यानुसार आपणास देण्यात आलेली कृपादाने आहेत.
- परमेश्वराची “दाने व पाचारण” सोबतच आहेत (रोम ११:२९). आपणास ठाऊक आहे की आपणास विशिष्ट काम करावयास पाचारण करण्यात आलेले आहे, आपणाजवळ ते कार्य पूर्ण करण्यात मदत करावयासाठी कृपादाने देण्यात आलेली आहेत.
- सर्वच कृपादाने “आध्यात्मिक” स्वरूपाची आहेत.

इफिस ३:१,७,८

**७ ह्या कारणास्तव मी पौल तुम्हां परराष्ट्रीयांसाठीं ख्रिस्त येशूचा बंदिवान्**
**आहें. देवाच्या सामर्थ्याच्या करणीनें त्याचें जें कृपेचें दान मला देण्यांत आलें**
**होतें तेणेंकरून मी त्या सुवार्तेचा सेवक झालों आहें. ८ मी जो सर्व पवित्र**
**जनांतील लहानाहून लहान त्या माझ्यावर ही कृपा अशी झाली कीं, मीं**
**ख्रिस्ताच्या अगाध समृद्धीची सुवार्ता परराष्ट्रीयांना सांगावी.**

- परमेश्वराची कृपा आपणास नेहमीच एका हेतूने दिली जाते – विशिष्ट हेतू साध्य करण्यासाठी. उदाहरणार्थ, रोग्यांस बरे करण्यासाठी, वृद्धांची अथवा मुलांची सेवा करण्यासाठी.
- परमेश्वराने आपणास ज्या क्षेत्रात ही कृपा दिली आहे. त्याच क्षेत्रात आपणास असे आढळून येईल की परमेश्वराचे सामर्थ्य आपल्या जीवनात प्रभावीपणे कार्य करीत आहे.

इफिस ४:७–११

**७ तरी आपणांपैकीं प्रत्येकाला ख्रिस्तानें दिलेल्या दानाच्या परिमाणाप्रमाणें**
**अनुग्रहरूपी देणगी प्राप्त झाली आहे. ८ ह्यास्तव तो म्हणतो, ‘त्यानें उच्चस्थानीं**
**आरोहण केलें तेव्हां त्यानें कैद्यांना कैद करून नेलें,व मानावांना देणग्या दिल्या.**
**’ ९ त्यानें ‘आरोहण केलें,’ ह्यावरून तो पृथ्वीच्या अधोलोकीं उतरला होता,**
**ह्यापेक्षां दुसरे काय समजावें? १० जो खालीं उतरला होता त्यानेंच सर्व कांहीं**
**भरून टाकण्याच्या उद्देशानें सर्वोच्च स्वर्गावर ‘आरोहण केलें;’ ११ आणि**

**त्यानेंच कोणी प्रेषित, कोणी संदेष्टे, कोणी सुवार्तिक, कोणी पाळक व शिक्षक असे 'नेमून दिले;'**

काहींना विशिष्ट पदांत/ सेवांत कार्य करण्यास पाचारण देण्यात आलेले आहे.

आपणास देण्यात आलेली परमेश्वराची कृपा ओळखावी.

आपणास देण्यात आलेली कृपेची दाने परमेश्वराची क्षमता व आपल्या जीवनासाठी त्याचा हेतू प्रगट करतात.

ज्याप्रकारे आपणास घडविण्यात आलेले आहे, त्यावरून हे प्रगट होते की आपणास कशाकरिता घडविण्यात आलेले होते. परमेश्वराच्या कृपेच्या दानांची जोपासणूक, विकास करण्याची गरज आहे आणि परमेश्वराचा हेतू पूर्ण करण्यासाठी त्यांचा उपयोग करण्यात यावा.

## २.४.२ कृपा आणि कार्य

१ कुरिंथ १५:१०

**तरी जो कांहीं मी आहें तो देवाच्या कृपेनें आहें आणि माझ्यावर त्याची जी कृपा झाली आहे ती व्यर्थ झाली नाहीं; परंतु त्या सर्वांपेक्षां मीं अतिशय श्रम केले ते मीं केले असें नाहीं, तर माझ्याबरोबर असणाऱ्या देवाच्या कृपेनें केले.**

## २.५ परमेश्वराच्या आत्म्याचे मार्गदर्शन ओळखणे

रोम ८:१४-१६

**१४ कारण जितक्यांना देवाचा आत्मा चालवीत आहे तितके देवाचे पुत्र आहेत;**
**१५ कारण पुन्हा भीति बाळगावी असा दासपणाचा आत्मा तुम्हांला मिळाला नाहीं; तर ज्याच्या योगें आपण अब्बा, बापा, अशीं हाक मारितों 'असा दत्तकपणाचा आत्मा तुम्हांला मिळाला आहे.**
**१६ तो आत्मा स्वतः आपल्या आत्म्याबरोबर साक्ष देतो कीं, आपण देवाचीं मुलें आहों;**

योहान १६:१३-१५

**१३ तरी तो सत्याचा आत्मा येईल तेव्हां तो तुम्हांला मार्ग दाखवून सर्व सत्यांत नेईल; कारण तो आपल्या स्वतःचें सांगणार नाहीं; तर जें कांहीं ऐकेल, तेंच सांगेल; आणि होणाऱ्या गोष्टी तुम्हांस कळवील. १४ तो माझें गौरव करील; कारण जें माझें आहे त्यांतून घेऊन तें तुम्हांस कळवील. १५ जें कांहीं पित्याचें आहे तें सर्व माझें आहे; म्हणून मी म्हणालो कीं, जें माझें आहे त्यांतून तें तुम्हांस कळवील.**

१ करिंथ २:६,१०

**६ हें तर ह्या शास्त्रलेखाप्रमाणें आहेः 'डोळ्यानें जे पाहिलें नाहीं, कानानें जें ऐकलें नाहीं' व माणसाच्या 'मनांत जें आलें नाहीं, तें आपणावर प्रीति करणाऱ्यांसाठीं देवानें' सिद्ध केलें आहे; १० कारण देवानें तें आत्म्याच्या द्वारें आपल्याला प्रगट केलें, कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा व देवाच्या गहन गोष्टींचाहि शोध घेतो.**

योहान ३:८

**वारा पाहिजे तिकडे वाहतो आणि त्याचा आवाज तुम्ही ऐकतां, तरी तो कोठून येतो व कोठें जातो हें तुम्हांला कळत नाहीं; जो कोणी आत्म्यापासून जन्मलेला आहे त्याचें असेंच आहे.**

## २.५.१ पवित्र आत्मा आमच्याशी कशाप्रकारे बोलतो?

- तो आमच्या आत्म्याबरोबर साक्ष देतो.
- लिखित/बोलण्यात आलेली वचने आमच्यासाठी संजीवित करतो.
- कल्पना, विचार आणि चित्र
- स्वप्न आणि दर्शन
- भविष्यद्वाणीचे वचन

### २.५.२ आम्हास कसे माहीत की पवित्र आत्मा बोलत आहे?

जेव्हा पवित्र आत्मा बोलतो, तेव्हा तो प्रभू येशूचे गौरव करतो. आपण जे काही ऐकत आहात, ते पवित्र आत्म्याकडून आहे किंवा आपली भावना बोलत आहे, हे जाणून घेण्याची ही उत्तम कसोटी आहे.

## २.६ परिस्थिती ओळखणे

२ इतिहास १६:९
**परमेश्वराचे नेत्र अखिल पृथ्वीचे निरीक्षण करीत असतात, जे कोणी सात्विक चित्ताने त्याच्याशी वर्ततात त्याचे साहाय्य करण्यात तो आपले सामर्थ्य प्रगट करितो. हा तू मूर्खपणा केला म्हणून यापुढे तुझ्यामागे लढाया लागणार.**

स्तोत्र ३७:२३,२४
**२३ परमेश्वर मनुष्याची गति स्थिर करितो, आणि त्याचा मार्ग त्याला प्रिय आहे. २४ तो पडला तरी सपेशल पडणार नाही; कारण परमेश्वर त्याला हाथ देऊन सावरील.**

- परमेश्वर अशी परिस्थिती उत्पन्न करतो, परंतु तुम्ही व मी त्याला प्रतिसाद दिला पाहिजे.
- परमेश्वर आमच्या जीवनातील परिस्थिती व घटना घडवून आणतो ज्या आमच्यासाठी त्याच्या योजनेनुसार व हेतूनुसार असतात.
- त्याच्या मार्गात चालण्यात आपली मदत व्हावी म्हणून परमेश्वर लोक, स्थाने व वस्तू आपल्या मार्गात उभ्या करतो.
- परिस्थिती ओळखा आणि तिला प्रतिसाद द्या.
- आपल्या जीवनात परमेश्वराद्वारे योजण्यात आलेली प्रत्येक परिस्थिती (जी मधुर वाटते) सोपी अथवा सुखदायक असतेच असे नाही, परंतु तिचे मोल स्थाई असते. उदाहरणार्थ, आळस दूर करणारी परिस्थिती,

पैशाचा योग्यप्रकारे कसा उपयोग करावा हे शिकविणारी परिस्थिती; धैर्य व सोशिकपणा उत्पन्न करणारी परिस्थिती.

इब्री १२:५-११

**५ आणि तुम्हांला पुत्राप्रमाणें केलेला हा बोध तुम्ही विसरून गेलां आहां काय?
'माझ्या मुला, परमेश्वराच्या शिक्षेचा अनादर करूं नको, आणि त्याच्याकडून
दोष पदरीं पडला असता खचूं नको; ६ कारण ज्याच्यावर परमेश्वर प्रीति
करितो, त्याला तो शिक्षा करितो आणि ज्या पुत्रांना तो स्वीकारितो त्या
प्रत्येकाला फटके मारितो.' ७ 'शिक्षणासाठीं' तुम्ही शिक्षा सहन करीत आहां;
देव तुम्हांला 'पुत्राप्रमाणें' वागवितो, आणि ज्याला बाप 'शिक्षा करीत' नाहीं
असा कोण पुत्र आहे? ८ ज्या शिक्षेचे वांटेकरी सर्व झाले आहे अशा
'शिक्षेवांचून तुम्ही जर आहां तर तुम्ही 'पुत्र' नाहीं, जारजसंतति आहां. ९
शिवाय शिक्षा करणारे असे आमच्या देहाचे बाप आपल्याला होतें आणि
आपण त्यांची भीड धरीत असूं; तर आपण विशेषेंकरून जो आत्म्यांचा पिता
त्याच्या अधीन होऊन जिवंत राहूं नये काय? १० त्यांना योग्य वाटली तशी थोडे
दिवस ते शिक्षा करीत होते; पण तो करितो ती आपल्या हितासाठीं, म्हणजे
आपण त्याच्या पवित्रेतेचे वांटेकरी व्हावें म्हणून करितो. ११ कोणतीहि शिक्षा
तत्कालीं आनंदाची वाटत नाहीं, खेदाची वाटते; तरी ज्यांना तिच्याकडून
वळण लागलें आहे त्यांना ती पुढें नीतिमत्त्व हें शांतिकारक फळ देते.**

अनुवाद ८:१-१०

**१ जी आज्ञा मी आज तुम्हाला देत आहे ती सर्व काळजीपूर्वक पाळा, म्हणजे
तुम्ही जगाल; बहुगुणित व्हाल आणि तुमच्या पूर्वजाना परमेश्वराने शपथपूर्वक
देऊ केलेल्या देशात प्रवेश करून तो वतन करून घ्याल. २ तुला लीन करावे
आणि तुझ्या मनात काय आहे म्हणजे तू त्याच्या आज्ञा पाळिशील की नाही
ह्याची कसोटी पाहावी म्हणून तुझा देव परमेश्वर ह्याने गेली चाळीस वर्षे तुला
रानातून कोणत्या रीतीने चालविले ह्याचे स्मरण कर. ३ मनुष्य केवळ भाकरीने
नव्हे तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल ह्याची
जाणीव तुला व्हावी म्हणून त्याने तुला लीन केले, तुझी उपासमार होऊ दिली,
आणि तुला किंवा तुझ्या पूर्वजांना माहीत नसलेला मान्ना खाऊ घालून त्यांने तुझे**

**पोषण केले. ४ हीं चाळीस वर्षे तुझ्या अंगावरचे कपडे जीर्ण झाले नाहीत, आणि तुझे पाय सुजले नाहीत. ५ मनुष्य आपल्या मुलाला शिक्षा करितो तशी तुझा देव परमेश्वर तुला शिक्षा करीत आहे हे लक्षात ठेव. ६ म्हणून तुझा देव परमेश्वर ह्याच्या मार्गांनी चालून व त्याचे भय बाळगून त्याच्या आज्ञा पाळ.
७ कारण तुझा देव परमेश्वर तुला एका उत्तम देशांत घेऊन जात आहे; खोऱ्यांत व डोंगरांत उगम पावून पाण्याने भरलेले नाले, झरे व ओढे त्यांत वाहत आहेत;
८ गहूं, जव, द्राक्षवेली, अंजीर व डाळिंबे ह्याचा तो देश आहे; ९ त्या देशांत टंचाई न पडता तूं अन्न खाशील; तुला कोणत्याही गोष्टीची वाण पडणार नाही; तेथले धोंडे लोहयुक्त आहेत व तेथल्या डोंगरांतून तुला तांबें खणून काढिता येईल. १० तूं खाऊनपिऊन तृप्त होशील आणि तुझा देव परमेश्वर ह्याने तुला दिलेल्या उत्तम देशाबद्दल त्याचा धन्यवाद करिशील.**

- आपण तोंड देत असलेली प्रत्येक परिस्थिती परमेश्वराने योजिलेली नसते. काही परिस्थिती आपल्या कृत्त्यांचा परिणाम म्हणून घडून येतात, काही इतर लोकांच्या कृत्त्यांचा परिणाम असतात आणि काही सैतानाद्वारे आणलेल्या असतात.
- आपणास कोणत्याही वाईट परिस्थितीला तोंड का द्यावे लागेना, परंतु परमेश्वर त्याच्या हेतूमध्ये पुढे वाढण्यासाठी तिच्यात फेरबदल करावयास समर्थ आहे. उदाहरणार्थ, योसेफ (उत्पत्ती ३७; ५०:१५).
- परिस्थिती ओळखा अथवा जाणून घ्या आणि योग्य ते पाऊल उचला. नीतिसूत्रे ४:२६ यात लिहिले आहे, “आपल्या पायाची वाट सपाट कर; तुझे सर्व मार्ग निश्चित असोत.”

## २.७ दैवी सल्ला आणि बुद्धी ओळखणे

- मसलत सल्ला, निर्देश, आपणास देण्यात आलेले ज्ञान आहे.
- सल्ला आज्ञा नाही.

- दैवी सल्ला तो सल्ला आहे जो एकाद्या स्त्री अथवा पुरुषाद्वारे दिला जातो, ज्याचे परमेश्वराशी खोल, दृढ, खंबीर, पारखलेले नाते असते - ज्ञान व अनुभवाच्या आधारे.

**उदाहरणः**

१ करिंथ ७:१०-१४; २५-२८ (१०, १२, २५ या वचनांवर लक्ष द्या.)
**[१०] परंतु ज्यांनीं लग्न केलें आहे त्यांना मी आज्ञा करितों, मी नव्हे तर प्रभु**
**करितो कीं, पत्नीनें पतीपासून वेगळें होऊं नये; [११] परंतु ती वेगळी झालीच तर**
**तिनें लग्न केल्यावांचून राहावें किंवा पतीबरोबर समेट करावा आणि पतीनेंहि**
**पत्नीला सोडूं नये. [१२] इतरांना, प्रभु नव्हे तर मी म्हणतों कीं, जर कोणा एका**
**बंधूची पत्नी ख्रिस्तीतर असली, आणि ती त्याच्याजवळ नांदावयास राजी**
**असली, तर त्यानें तिला सोडूं नये. [१३] आणि ज्या स्त्रीचा पति ख्रिस्तीतर असून**
**तिच्याजवळ राहावयास राजी असेल त्याला तिनें सोडूं नये. [१४] कारण पत्नीच्या**
**द्वारें ख्रिस्तीतर पति पवित्र झाला आहे आणि ख्रिस्ती पतीच्या द्वारें ख्रिस्तीतर**
**पत्नी पवित्र झाली आहे; कुमारिकांविषयीं मला प्रभूची आज्ञा नाहीं, तथापि**
**ज्या माझ्यावर विश्वासू होण्याची दया प्रभूद्वारें झाली आहे तो मी आपलें मत**
**सांगतो; [२६] तें असें कीं, प्रस्तुतच्या अडचणीमुळें जो ज्या स्थितींत आहे त्या**
**स्थितींत त्यानें राहावें हें माणसाला बरें. [२७] तूं पत्नीला बांधलेला आहेस काय?**
**असलास तर मुक्त होण्यास पाहूं नको. पत्नीपासून मुक्त आहेस काय? असलास**
**तर पत्नी करण्यास पाहूं नको. [२८] तथापि तूं लग्न केलेंस म्हणून पाप केलेंस**
**असें होत नाहीं. तसेंच कुमारिकेनें लग्न केलें म्हणून तिनें पाप केलें असें होत**
**नाहीं; तरी पण अशांना संसारांत हालअपेष्टा भोगाव्या लागतील आणि अशा**
**हालअपेष्टा तुम्हांला भोगाव्या लागूं नयेत अशी माझी इच्छा आहे.**

- सल्ला प्राप्त करण्याची किंमत.

नीतिसूत्रे ५:२३
**त्याला शिक्षण मिळाले नाही म्हणून तो मरतो; तो आपल्या अति मूर्खपणामुळे भ्रांत होतो.**

नीतिसूत्रे १०:१७

**बोधाकडे लक्ष पुरविणारा जीवनाच्या मार्गांत असतो, परंतु शिक्षण सोडणारा भ्रांत होतो.**

नीतिसूत्रे ११:१४

**शहाणा मार्गदर्शक नसल्यामुळे लोकांचा अधःपात होतो, पण सुमंत्री बहुत असले म्हणजे कल्याण होते.**

नीतिसूत्रे १५:२२

**शहाणपणाने व्यवस्था करून युद्ध चालीव; बहुत सुमंत्री असल्याने यश मिळते.**

नीतिसूत्रे २०:१८

**प्रत्येक बेत मसलतीने सिद्धीस जातो; शहाणपणाने मार्गास लागून युद्ध चालीव.**

नीतिसूत्रे २४:६

**शहाणपणाने व्यवस्था करून युद्ध चालीव; बहुत सुमंत्री असल्याने यश मिळते.**

- परमेश्वर नीतिमान लोकांच्या मसलतीचा उपयोग करू शकतो ज्यांस त्यांनी आपल्या जीवनात ठेविलेले आहे, जेणेकरून आपल्या जीवनात त्याची योजना व हेतू यांत आपले मार्गदर्शन करण्यात आपली मदत करावी.
- नम्रपणे त्या मसलतीचा स्वीकार करा.

## उदाहरणः मोशे आणि इथ्रो (निर्गम १८:१३-२७)

तीन प्रकारचा सल्ला :

## २.७.१ व्यक्तीचे आपले ज्ञान व अनुभव यावर आधारित सल्ला.

- आपण कोणाकडून सल्ला घेता याविषयी सावध असावे.

स्तोत्र १:१

**जो पुरुष दुर्जानांच्या मसलतीने चालत नाही; पापी जनांच्या मार्गात उभा राहत नाही; आणि निंदकाच्या बैठकीत बसत नाही.**

## २.७.२ परमेश्वराच्या लिखित वचनावर आधारित सल्ला

## २.७.३ भविष्यात्मक प्रेरणेवर आधारित सल्ला

- पहिली व तीसरी गरज ही आहे की आपण ती मसलत पारखून घ्यावी, तिचे परीक्षण करावे, व ती समजून घ्यावी.
- संदेष्ट्याने म्हटलेली प्रत्येक गोष्ट भविष्यद्वाणी असेल असे नाही.

१ इतिहास १७:१-५

**[१] दावीद आपल्या मंदिरात राहू लागला तेव्हा त्याने नाथान संदेष्ट्यास म्हटले,
पाहा, मी गंधसरूच्या मंदिरात राहत आहे, पण परमेश्वराच्या कराराचा कोश
कनाथीखाली आहे. [२] नाथान दाविदास म्हणाला, तुझ्या मनात जे काही असेल
ते कर, कारण देव तुझ्याबरोबर आहे. [३] त्याच रात्री देवाचे वचन नाथानाला
प्राप्त झाले ते असे; [४] माझा सेवक दावीद यास सांग, परमेश्वर म्हणतो, माझ्या
निवासासाठी तुला मंदिर बांधावयाचे नाही. [५] ज्या दिवशी इस्त्राएल लोकांस मी
मिसर देशांतून बाहेर काढिले तेव्हापासून आज दिवसपर्यंत माझा निवास कधी
मंदिरात झाला नाही. डेऱ्यातून व मंडपातून मी भ्रमण करीत आहे.**

## २.८ काळ व वेळ ओळखणे

- परमेश्वराजवळ एक दिनदर्शिका आहे. त्याच्याजवळ एक वेळापत्रक आहे. तो आपल्या कालनिर्णयानुसार अथवा दिनदर्शिकेनुसार काम करतो.
- परमेश्वर जी कामे करतो त्यासाठी त्याच्याजवळ नेमलेला वेळ व काळ आहे.

उत्पत्ती ३:१५ – आणि तू व स्त्री, तुझी संतति व तिची संतति यांमध्ये मी परस्पर वैर स्थापीन; ती तुझे डोके फोडील, व तूं तिची टांच फोडशील. ४००० वर्षे!

गलती ४:४ – परंतु काळांची पूर्णता झाली तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठविले; तो स्त्रीपासून जन्मलेला, नियमशास्त्राधीन असा जन्मलेला असा होता.

- आपल्या जीवनासाठी परमेश्वराजवळ काळ व समय आहेत.

स्तोत्र ३१:१५
**माझे दिवस तुझ्या हाती आहेत, माझ्या वैऱ्यांच्या हातातून, माझ्या पाठीस लागणाऱ्यांपासून मला सोडीव.**

उपदेशक ३:१-११
**१ सर्वांचा काही उचित काळ म्हणून असतो, भूतलावरील प्रत्येक कार्याला समय**
**असतो. २ जन्मसमय व मृत्युसमय, रोपण्याचा समय व रोपलेले उपटण्याचा**
**समय असतो; ३ वधवयाचा समय व बांधून काढण्याचा समय असतो; ४**
**रडण्याचा समय व हसण्याचा समय, शोक करण्याचा समय व नृत्य करण्याचा**
**समय असतो; ५ धोंडें फेकून देण्याचा समय व धोंडें गोळा करण्याचा समय,**
**आलिंगन देण्याचा समय व आलिंगन देण्याचे आंवरून धरण्याचा समय असतो;**
**६ शोधण्याचा समय व गमावण्याचा समय, राखून ठेवण्याचा समय व टाकून**
**देण्याचा समय असतो; ७ फाडून टाकण्याचा समय व शिवण्याचा समय, मौन**
**धरण्याचा समय बोलण्याचा समय असतो; ८ प्रेम करण्याचा समय व द्वेष**
**करण्याचा समय असतो. ९ मनुष्य ज्यासाठी कष्ट करितो त्यांत त्याला काय**
**लाभ? १० मानवजातीस जे कष्ट देव भोगावयास लावीत असतो ते मी पाहिले**
**आहेत. ११ आपआपल्या समयीं होणारी हरएक वस्तु त्याने सुंदर बनविली**
**आहे, त्याने मनुष्याचा मनात अनंतकालाविषयीची कल्पना उत्पन्न केली आहे,**
**तरी देवाचा आदिपासून अंतापर्यंतचा कार्यक्रम मनुष्याला उमगत नाही.**

उपदेशक ८:५,६

**५ जो आज्ञा पाळितो तो अनिष्ट पाहणार नाही; नेमिलेला काळ व न्यायसमय**
**हे ज्ञान्याच्या मनाला अवगत होतील. ६ प्रत्येक गोष्टीला नेमिलेला काळ व**
**न्यायसमय असतो, कारण मनुष्याची भयंकर दुर्दशा होते.**

- प्रत्येक काळामागे एक कारण नेमलेले असते.
- ज्या जीवनात आम्ही आहोत, त्याचा काळ जेव्हा आम्ही ओळखतो, तेव्हा परमेश्वराचा हेतू ओळखणे सोपे जाते.

१ इतिहास १२:३२

**कालप्रवृत्ति ओळखून इस्त्राएलाने काय करावे हे ज्यांना कळत होते असे इस्साखार वंशांतील दोनशे नायक आले; त्याचे सर्व भाऊबंद त्यांच्या आज्ञेत होते.**

## कालप्रवृत्ती ओळखणे

- यावेळी आपण ज्या काळात आहात, त्या काळासाठी परमेश्वराचा हेतू पूर्ण करा. तेव्हा तो आपणास जीवनाची पुढील संधी देईल.

mnkgj.k%

- पाया टाकण्याचा काळ

यात खालील गोष्टींचा समावेश आहे :

  - खोदणे, उभारणे नाही.
  - चमक नव्हे, केवळ परिश्रम
  - टाळ्या नव्हे, केवळ प्रेक्षक

हेतू :

- मजबूत पाया
- खोल पाया
- असा पाया जो आपल्या विस्ताराची मोकळीक देईल

- बोगद्याचा काळ

जेव्हा आपण बोग़द्यातून जाता, तेव्हा त्यात एकच मार्ग असतो, पुढे वाढण्याचा. आपण डावीकडे वळू शकत नाही, उजवीकडेही नाही, व मागेही वळता येत नाही. तेथे अंधार असतो. आपल्याजवळ केवळ एकच प्रकाश असतो, आपल्या डोळ्यांवर विश्वास ठेवणे. तेथे हादरून सोडण्यासाठी पर्वत नसतात. बाहेर पडण्याचा केवळ एक मार्ग असतो - त्यातून चालत राहणे. विश्वासू राहणे!

- केवळ पुरेसे याचा काळ, या विपरीत विपुलता, रेलचेल व कापणीचा काळ
- दु:ख आणि व्यथांचा काळ
- परीक्षांचा व आव्हानांचा काळ
- मातृत्वाचा काळ

दुसरी व्यक्ती जीवनाच्या ज्या समयातून जात असते, त्या समयाचा मान राखावयास शिकले पाहिजे.

## २.६ परमेश्वराची कार्य करण्याची पद्धत ओळखणे

परमेश्वरास उदाहरण, नमूने व कित्ते तयार करण्याची सवय आहे, जेणेकरून आम्हास त्यांचे अनुसरण करता यावे. माझे म्हणणे हे आहे की तो आमच्या जीवनात कार्य करण्याची पद्धत आखतो.

१ तीमथ्य. १:१५,१६

**[१५] ख्रिस्त येशू पापी लोकांना तारावयास जगांत आला, हें वचन विश्वसनीय व पूर्णपणें स्वीकारावयास योग्य आहे; त्या पापी लोकांपैकीं मी मुख्य आहें. [१६]**
**तरी जे युगानुयुगाच्या जीवनासाठीं त्याच्यावर विश्वास ठेवणार आहेत, त्यांना उदाहरण व्हावें म्हणून येशू ख्रिस्तानें, मी जो मुख्य त्या माझ्याविषयीं आपली सर्व सहनशीलता दाखवावी म्हणून माझ्यावर दया झाली.**

आम्ही अब्राहामाच्या विश्वासावर पाऊल ठेवून चालतो.

रोम ४:११,१२

**[११] आणि तो 'सुंता झालेला असतांना' त्यांच्या ठायीं असलेल्या विश्वासामुळें जें नीतिमत्त्व प्राप्त होतें, त्याचा शिक्का म्हणून 'सुंता ही खूण त्याला मिळाली; ह्यासाठीं कीं, जे लोक सुंता न झालेले असतां आपल्याकडे नीतिमत्त्व गणिलें जावें म्हणून विश्वास ठेवितात, त्या सर्वांचा त्यानें बाप व्हावें.**
**[१२] आणि त्यानें सुंता झालेल्या लोकांचाहि बाप व्हावें, पण केवळ ते सुंता झालेले आहेत म्हणून नव्हे तर आपला बाप अब्राहाम सुंता न झालेला असतां त्याचा जो विश्वास होता, त्यालाहि अनुसरून चालतात म्हणून त्यांचा बाप व्हावें.**

इतरांचे जीवन आमच्यासाठी उदाहरणस्वरूप आहे.

याकोब ५:१०,११

**[१०] बंधूंनो, जे संदेष्टे प्रभूच्या नांवानें बोलले त्यांचे दुःखसहन व त्यांचा धीर ह्यांविषयींचा कित्ता घ्या.**
**[११] पाहा, 'ज्यांनीं सहन केलें त्यांना आपण धन्य म्हणतों;' तुम्हीं ईयोबाच्या धीराविषयीं ऐकलें आहे, आणि त्याच्याविषयींचा प्रभूचा जो हेतु होता तो तुम्हीं पाहिला आहे; ह्यावरून 'प्रभू फार कनवाळू व दयाळू' आहे हें तुम्हांस दिसून आलें.**

१ करिंथ १०:५,११

**[५] तरी त्यांच्यापैकीं बहुतेकांविषयीं देव संतुष्ट नव्हता; ह्यामुळे 'त्यांचा रानांत नाश झाला.'**
**[६] ह्या गोष्टी आपल्याला उदाहरणांदाखल झाल्या, अशा हेतूनें कीं, त्यांनी 'लोभ धरिला' तसा आपण वाईट गोष्टींचा 'लोभ धरूं नये.'**
**[७]**

**त्यांच्यापैकीं कित्येक मूर्तिपूजक होते तसे तुम्ही होऊं नका; ‘लोक खावयाला
प्यावयाला बसले, नंतर नाचतमाशा करावयास उठले’ असें शास्त्रांत लिहिलेलें
आहे. ८ त्यांच्यापैकीं कित्येकांनीं जारकर्म केलें व ते एका दिवसांत तेवीस हजार
मरून पडले; तेव्हां आपण जारकर्म करूं नये. ९ त्यांच्यापैकीं कित्येकांनीं प्रभूची
परीक्षा पाहिली आणि ते सापांच्या योगें नाश पावले; तेव्हां आपण प्रभूची
परीक्षा पाहूं नये. १० त्यांच्यापैकीं कित्येकांनीं कुरकुर केली आणि ते संहारकर्त्याकडून
नाश पावलें, तेव्हां तुम्ही कुरकुर करूं नका ११ ह्या गोष्टी उदाहरणादाखल
त्यांच्यावर गुदरल्या आणि जे आपण युगांच्या समाप्तीप्रत येऊन पोहंचलों
आहोंत त्या आपल्या बोधासाठीं त्या लिहिल्या आहेत.**

# ३

# परमेश्वराच्या तयारीची प्रक्रिया ओळखणे

परमेश्वर ज्यांस उपयोग करू इच्छितो त्यांस तो हळूहळू तयार करतो.

## ३.१ तयारीच्या प्रक्रियेद्वारे परमेश्वर काय तयार करू इच्छितो?

२ तीमथ्य. २:१९-२१

**१९ तथापि देवानें घातलेला स्थिर पाया टिकून राहतो, त्यावर हा शिक्का मारलेला आहेः 'प्रभु आपले जे आहेत त्यांना ओळखितो,' आणि 'जो कोणी प्रभूचें नांव घेतो त्यानें अनीतीपासून दूर राहावें.'**
**२० मोठ्या घरांत केवळ सोन्याचीं व रूप्याचीं पात्रें असतात असें नाहीं तर लाकडाचीं व मातीचींहि असतात; त्यांपैकीं कित्येकांचा उपयोग मानमान्यतेच्या कार्यासाठीं होतो व कांहींचा हलक्या कार्यासाठीं होतो.**
**२१ ह्यास्तव जर कोणी त्यांपासून दूर राहून स्वतःला शुद्ध करील, तर तो पवित्र केलेले, स्वामीला उपयोगी पडणारें, प्रत्येक चांगल्या कामास तयार केलेलें, असें मानाचें पात्र होईल.**

- परमेश्वर आपणास मानाचे (ग्रीक भाषेत, मोल, किंमत, सन्मान) पात्र (ग्रीक भाषेत, हत्यार अथवा साधन) बनवू इच्छितो.
- परमेश्वराची अशी इच्छा आहे की आपण पवित्र (ग्रीक भाषेत, शुद्ध, पवित्र केलेले) बनावे, जे त्याच्यानिमित्ताने वेगळे केलेले असे आहेत.
- परमेश्वराची अशी इच्छा आहे की आपण स्वामीला उपयोगी पडणारे (ग्रीक भाषेत, उपयोगी, लाभदायक, योग्य) असे ठरावे.
- परमेश्वराची अशी इच्छा आहे की आपण प्रत्येक चांगल्या कामासाठी तयार केले जावे (ग्रीक भाषेत, तयार केलेले), त्याच्यानिमित्ताने वेगळे केले जावे.

परमेश्वराची तयारीची प्रक्रिया अखंडीत आहे. जीवनाच्या प्रत्येक पैलूत तो आपणास पुढील अनुभवासाठी तयार करीत आहे. आम्ही तयारीच्या प्रक्रियेद्वारे परमेश्वरासोबत कार्य करावयास व त्यास सहयोग द्यावयास शिकले पाहिजे.

**पवित्र शास्त्रातून उदाहरण :**

## मोशे (प्रेषितांची कृत्ये ७:२०-३४)

- परमेश्वराने मोशेसाठी अलौकिकरित्या फारोच्या राजदरबारात शिक्षण आणि प्रशिक्षण घेण्याची व्यवस्था केली. मोशेच्या जीवनात हे परमेश्वराच्या "आध्यात्मिक भवितव्याचे बीज" होते (प्रेषितांची कृत्ये ७:२२). स्वर्गीय हेतूपूर्तीसाठी ही मोशेची प्रारंभिक तयारी होती.
- वयाच्या चाळीसाव्या वर्षी, मोशे आपला दैवी हेतू समजू लागला. परंतु, त्याने आपल्या पद्धतीने हे साध्य करण्याचा प्रयत्न करण्याची चूक केली.
- जेव्हा जेव्हा आम्ही आपल्या सामर्थ्याने काही करण्याचा प्रयत्न करतो - तेव्हा आम्ही परमेश्वराची योजना पूर्ण करण्यात विलंब करतो. मोशेने हे सर्व काही एकट्याने करण्याचा प्रयत्न केला आणि चाळीस वर्षे उशीर झाला.
- मोशेला अरण्यात चाळीस वर्षे घालवावी लागली (प्रेषितांची कृत्ये ७:२९-३०; निर्गम २:१५,२३), केवळ यासाठी कारण त्याला राजाच्या मरणाची वाट पाहावी लागली ज्यास त्याने क्रोधित केले होते.

  ऐंशी वर्षांच्या वयात मोशेने आपले दैवी मिशन सुरू केले.
- पुढील ४० वर्षें, त्याने आपल्या जीवनाचा हेतू पूर्ण करण्यात घालविली.

## दावीद

- दावीद जेव्हा तरूण होता, तेव्हा त्याला राजा बनविण्यासाठी अभिषेक करण्यात आला. तो त्यावेळी सतरा वर्षांचा असेल असे मानून चालू या.

- आपल्या पित्याची मेंढरे राखत असतांना त्याने आपले प्रारंभिक प्रशिक्षण मिळविले. याचवेळी तो संगीत कलेतही पारंगत झाला असावा, त्याने सिंह व अस्वलाचा वध केला असावा आणि इस्राएल लोकांत मोठी कीर्ती मिळविली असावी.
- जेव्हा त्याने गल्याथाला मारले आणि राष्ट्रीय वीर म्हणून ख्याती मिळविली, तेव्हा त्याला सुरवातीला यश मिळाले.
- परंतु काळ बदलत गेला आणि जेव्हा राजा शौल याने त्याला मारून टाकण्याचा निर्धार केला, तेव्हा त्याला आपला जीव घेऊन पळावे लागले. पुढील सहा वर्षे दावीद भटक्याप्रमाणे जीवन घालवीत फिरला (१ शमूवेल २२:१,२). ज्या व्यक्तीचा राजा बनण्यासाठी अभिषेक झाला होता, त्याने आपला बहुतेक काळ गुहेत घालविला!
- परंतु याचवेळी परमेश्वराने अशा लोकांस त्याजकडे पाठविले जे दावीदास जाऊन मिळाले आणि नंतर त्याच्या बलशाली सैन्याचे महत्वपूर्ण सेनापती बनले!
- जेव्हा दावीद २३ वर्षांचा झाला, तेव्हा तो यहूदा प्रान्ताचा राजा बनला (२ शमूवेल २:१-४).
- शेवटी जेव्हा दावीद संपूर्ण इस्राएल व यहूदाचा राजा बनला, तेव्हा त्याचे वय ३० वर्षांचे होते (२ शमूवेल ५:४,५). त्याने ३३ वर्षे राजा म्हणून राज्य केले.
- संदेष्टा शमूएल याने त्याला ‘पाचारण केले’, त्या वेळेपासून त्या पाचारणात पाऊल टाकण्यासाठी जेव्हा त्याला ‘नेमण्यात आले’ त्या वेळेपर्यंत तेरा वर्षांची तयारी.

## पौल

- दिमिष्काच्या वाटेवर प्रभू येशू ख्रिस्ताशी पौलाची भेट झाली, त्यावेळी पौलाचे वय जवळपास ३३ वर्षांचे असेल. त्यास प्रशिक्षित होण्यास वर्षे लागलीत.
- प्रभू येशूशी जेव्हा त्याची भेट घडली तेव्हा प्रभूने त्याला हे प्रगट केले की त्याचे पाचारण गैरयहूदी लोकांसाठी आहे, तो विश्वासाचा प्रेषित आहे.
- पौलाने आरंभी दिमिष्क आणि अरब या ठिकाणी तीन वर्षे घालविली (गलती १:१६,१७; प्रेषितांची कृत्ये ९:१९-२५). लोकांनी दिमिष्क येथे त्याचा वध करण्याचा प्रयत्न केला आणि यासाठी तो अरब येथे पळून गेला आणि नंतर परत आला. याच काळात त्याला सुवार्तेचे बहुतांश प्रगटीकरण लाभले असावे ज्याचा त्याने प्रचार केला.
- यानंतर त्याने पंधरा दिवसांकरिता यरूशलेमेस भेट दिली (गलती १:१८; प्रेषितांची कृत्ये ९:२६-३०), याचवेळी त्याने मोठ्या धैर्याने सुवार्ता गाजविली. परंतु पुन्हा लोकांनी त्याला मारण्याचा प्रयत्न केला आणि तो तार्सास निघून गेला. त्याने सूरिया व किलिकिया येथे १३ वर्षे घालविली (गलती १:२१-२४; २:१).
- ह्या तेरा वर्षांच्या अंती, बर्णबा तार्सास आला व आपल्यासोबत शौलास घेऊन अंत्युखियास गेला (प्रेषितांची कृत्ये ११:२५,२६).
- त्या नंतर पौलाने अंत्युखियाच्या मंडळीस शिकवण देण्यात एक वर्ष घालविले.
- ह्या वर्षाच्या अंती पौलाने बर्णबास सोबत घेऊन यरूशलेमेचा दुसऱ्यांदा प्रवास केला. ह्या प्रवासाचा हेतू दुष्काळात मदत करणे हा होता (प्रेषितांची कृत्ये ११:२९,३०). म्हणून १४ वर्षानंतर तो यरूशलेमेस गेला (गलती २:१).

- दिमिष्काच्या वाटेवर जेव्हा प्रभूने त्याला भेट दिली तेव्हा १७ वर्षे पूर्ण झाली होती. यावेळी पौल ५० वर्षांचा असेल.
- पौलाचे ख्रिस्ती जीवन आणि परमेश्वरासोबत त्याच्या जीवनाच्या प्रथम १७ वर्षांविषयी काहीही लिहिण्यात आलेले नाही. अर्थात आम्हास हे ठाऊक आहे की यावेळी पौलाने सुवार्ता गाजविली आणि शिकवण दिली. आम्हास हे माहीत आहे की परमेश्वराच्या गुप्त गोष्टींसंबधाने त्याला प्रगटीकरण व समज प्राप्त झाली. परंतु त्याने यावेळी काय केले व काय सुवार्ता सांगितली याविषयी फारसे काही लिहिलेले नाही. यांस पौलाच्या जीवनाची शांत वर्षे म्हटलेले आहे. यहूदी धर्मांतर्गत त्याच्या प्रारंभिक शिक्षणाव्यतिरिक्त ही वर्षे सुद्धा त्याच्या प्रारंभिक प्रशिक्षणाचा भाग ठरली.
- शेवटी प्रेषितांची कृत्ये १३ यांत, १७ वर्षांनंतर, पौलास बर्णबासोबत त्याच्या पहिल्या मिशनरी प्रवासाचे पाचारण घडते (प्रेषितांची कृत्ये १३:१-४).
- प्रेषितांची कृत्ये १४:१४ यात, पौलास बर्णबासोबत पहिल्यांदा प्रेषित म्हणून संबोधण्यात आले आहे.

प्रभूसोबत त्याची भेट झाल्यानंतर १७ वर्षांनी पौलाने प्रेषित म्हणून सेवेत प्रवेश केले. प्रेषित पौलासही सतरा वर्षांच्या तयारीची व प्रशिक्षणाची गरज होती!! परमेश्वर घाईत नाही.

जेव्हा आपण परमेश्वराच्या तयारीच्या प्रक्रियेतून जातो, तेव्हा आपणास जीवनातील लपलेले गुण, कृपादाने व पाचारण दिसून येतील.

मत्तय १०:२६,२७

[२६] **ह्यास्तव त्यांना भिऊ नका; कारण उघडकीस येणार नाही असे कांही झांकलेले नाही आणि कळणार नाही असे कांही गुप्त नाही.** [२७] **जे मी तुम्हांस अंधारांत सांगतो ते उजेडांत बोला आणि तुमच्या कानांत सांगितलेले जे तुम्ही ऐकता ते धाब्यांवरून घोषित करा.**

लूक ६:४०

**शिष्य गुरूपेक्षां श्रेष्ठ नाहीं; पूर्ण झालेला प्रत्येक शिष्य आपल्या गुरूसारखा होईल.**

परमेश्वर आपणास ज्या तयारीतून नेतो त्याद्वारे :

- दैवी चारित्र्य
- सर्वच क्षेत्रात परिपक्वता

निर्माण होईल.

## ३.१.१ दैवी चारित्र्य

२ तीमथ्य. २:१९-२१

**[१९] तथापि देवानें घातलेला स्थिर पाया टिकून राहतो, त्यावर हा शिक्का मारलेला आहेः 'प्रभु आपले जे आहेत त्यांना ओळखितो,' आणि 'जो कोणी प्रभूचें नांव घेतो त्यानें अनीतीपासून दूर राहावें.' [२०] मोठ्या घरांत केवळ सोन्याचीं व रूप्याचीं पात्रें असतात असें नाहीं तर लाकडाचीं व मातीचींहि असतात; त्यांपैकीं कित्येकांचा उपयोग मानमान्यतेच्या कार्यासाठीं होतो व कांहींचा हलक्या कार्यासाठीं होतो. [२१] ह्यास्तव जर कोणी त्यांपासून दूर राहून स्वतःला शुद्ध करील, तर तो पवित्र केलेले, स्वामीला उपयोगी पडणारें, प्रत्येक चांगल्या कामास तयार केलेलें, असें मानाचें पात्र होईल.**

मत्तय ९:१७

**तसेंच कोणी नवा द्राक्षारस जुन्या बुधल्यांत घालीत नाहींत; घातला तर बुधले फुटून द्राक्षारस सांडतो आणि बुधले बिघडतात; तर नवा द्राक्षारस नव्या बुधल्यांत घालितात म्हणजे दोन्ही नीट राहतात.**

- परमेश्वर आमच्या कृपादानांपेक्षा आमच्या चारित्र्यात अधिक रुचि बाळगतो.
- आपले चारित्र्य आपणास जेथे ठेवू शकत नाही, तेथे आपले कृपादान आपणास घेऊन जाऊ शकते.

- आपले चारित्र्य तो पाया आहे ज्यावर आपल्या जीवनाची उभारणी होते.
- कृपादान व अभिषेक स्वर्गातून प्राप्त होतात, परंतु चारित्र्यनिर्मीती पृथ्वीवर होते.

स्तोत्र ५१:६

**पाहा, अंतर्यामींची सत्यता तुला आवडते; तू माझ्या अंतर्यामाला ज्ञानाची ओळख करून दे.**

- योग्य गोष्ट बोलणे व योग्य काम करणे यापेक्षा ख्रिस्ती जीवनात आणखी बरेच काही आहे. परमेश्वर दैवी चारित्र्याच्या शोधात आहे.

## ३.१.२ सर्व गोष्टींत परिपक्वता

इफिस. ४:११-१६

**११ आणि त्यानेंच कोणी प्रेषित, कोणी संदेष्टे, कोणी सुवार्तिक, कोणी पाळक**
**व शिक्षक असे 'नेमून दिले;' १२ ते ह्यासाठी की, त्यांनी पवित्र जनांस सेवेच्या**
**कार्याकरिता व ख्रिस्ताच्या शरीराची रचना पूर्णतेस नेण्याकरिता सिद्ध व्हावे.**
**१३ देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या व तत्संबंधी परिपूर्ण ज्ञानाच्या एकत्वाप्रत,**
**प्रौढ मनुष्यपणाप्रत, ख्रिस्ताची पूर्णता प्राप्त होईल अशा वृद्धीच्या मर्यादेप्रत**
**आपण सर्व येऊन पोहंचू तोंपर्यंत दिले; १४ ह्यासाठी की, आपण ह्यापुढे**
**बाळांसारखे असू नये, म्हणजे माणसांच्या धूर्तपणाने, भ्रांतीच्या मार्गास नेणाऱ्या**
**युक्तीने, प्रत्येक शिकवणरूपी वाऱ्याने हेलकावणारे व फिरणारे असे होऊ नये;**
**१५ तर आपण प्रीतीने सत्याला धरून मस्तक असा जो ख्रिस्त त्याच्याप्रत सर्व**
**प्रकारे वाढावे.**
**१६ त्याच्यापासून पुरवठा करणाऱ्या प्रत्येक सांध्याच्या योगे, सबंध शरीराची**
**जुळवणूक व जमवाजमव होत असते, आणि प्रत्येक अंग आपआपल्या परिमाणाने**
**कार्य करीत असता आपली रचना प्रीतीमध्ये होण्यासाठी शरीर आपली वृद्धि**
**करून घेते.**

- परमेश्वरासोबत वैय्यक्तिक जीवनात परिपक्वता. सर्व बाबतीत आज्ञाधारकपणा.

- लोकांबरोबर आमच्या जीवनात परिपक्वता.
- कृपादाने व पाचरणाच्या बाबतीत परिपक्वता.

मत्तय १०:१६, १७

**[१६] पाहा, लांडग्यांमध्यें मेंढरांना पाठवावें तसें मी तुम्हांला पाठवितों; म्हणून तुम्ही सापांसारखे चतुर व कबुतरांसारखे निरूपद्रवी व्हा.**
**[१७] माणसांच्या बाबतींत जपून राहा; कारण ते तुम्हांला न्यायसभांच्या स्वाधीन करतील, आपल्या सभास्थानांत तुम्हांला फटके मारतील.**

- दैवी चारित्र्य आणि परिपक्वता यांत आपली प्रगती उत्तरोत्तर आहे.
- जितक्यांदा आपण आज्ञापालनाच्या नवीन क्षेत्रात - धार्मिकतेच्या नव्या पातळीवर, परिपक्वतेच्या नव्या पातळीवर - पाऊल ठेवाल, आपण आपल्या जीवनात परमेश्वराच्या अभिषेकाची नवी पातळी अनुभव कराल.
- ज्या गोष्टी आपण आज शिकणार आहोत त्या उद्यासाठी आपणास तयार करतील. परमेश्वर आपणास आपला हेतू पूर्ण करण्यासाठी तयार करील.

## ३.२ परमेश्वर आम्हास कसे तयार करतो?

### ३.२.१ वचन

२ तीमथ्य. ३:१६,१७

**[१६] प्रत्येक परमेश्वरप्रेरित शास्त्रलेख सद्‌बोध, दोष दाखविणे सुधारणूक, नीतिशिक्षण ह्यांकरिता उपयोग आहे, [१७] ह्यासाठी की, देवाचा भक्त पूर्ण होऊन प्रत्येक चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा.**

### ३.२.२ पवित्र आत्मा

२ करिंथ ३:१८

**[१८] परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणें 'प्रभूच्या वैभवाचे' प्रतिबिंब पाडीत आहो आणि प्रभु जो आत्मा त्याच्या द्वारे,**

**तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहो.**

### ३.२.३ इतर लोकांद्वारे

नीतिसूत्रे २७:१७

**तिखे तिख्याला पाणीदार करिते, तसा मनुष्य आपल्या मित्राचा चेहरा पाणीदार करितो.**

- आपण ज्याप्रकारची कामे करू इच्छिता, त्याप्रकारची कामे करणाऱ्यांशी संगत करा.

### ३.२.४ जीवनाचे अनुभव

- जीवनाची बरी व वाईट वेळ आपणास बरेच काही शिकवून जाते.

रोम ५:३,४

**[३] इतकेंच नाही, तर संकटांचाहि अभिमान बाळगितो, कारण आपल्याला ठाऊक आहे की संकटाने धीर, [४] धीराने शील व शीलाने आशा निर्माण होते.**

याकोब १:२-४

**[२] माझ्या बंधूंनो, नाना प्रकाराच्या संकटांनी तुमची परीक्षा होते तेव्हा तुम्ही केवळ आनंदच माना. [३] तुम्हांस ठाऊक आहे की, तुमच्या विश्वासाची परीक्षा उतरल्याने धीर उत्पन्न होतो; [४] आणि धीराला आपले कार्य पूर्ण करू द्या ह्यासाठी की, तुम्ही कशांतहि उणे न होता तुम्हांला अखंड परिपूर्णता प्राप्त व्हावी.**

इब्री ५:८,९

**[८] तो पुत्र असूनहि त्याने जे दुःख सोशिले तेणेंकरून तो आज्ञाधारकपणा शिकला; [९] आणि परिपूर्ण केला जाऊन तो आपल्या आज्ञेंत राहणाऱ्या सर्वांचा युगानुयुगींच्या तारणाचा कर्ता झाला.**

- जीवनाच्या अनुभवाद्वारे आपणास असे पाठ शिकावयास मिळतील, जे आपण इतरत्र शिकू शकत नाही.
- आपण अनुभवी व्यक्तीचा नाकार करू शकत नाही.

## ३.३ परमेश्वराच्या तयारीच्या प्रक्रियेतून जात असतांना लक्षात ठेवण्यायोग्य बाबी

### ३.३.१ तयारीच्या प्रक्रियेतून जात असतांना आपण परमेश्वरास सहकार्य देण्यास व कार्य करण्यास तयार राहावयास शिकावे

१ करिंथ ३:६

**[६] कारण आम्ही देवाचे सहकारी आहो; तुम्ही देवाचे शेत, देवाची इमारत असे आहा.**

### ३.३.२ आपला आविर्भाव महत्वाचा आहे

### ३.३.३ जेथे सामर्थ्य आहे तेथे एकवाक्यता आहे

१ तीमथ्य ४:१५

**[१५] तुझी प्रगति सर्वांस दिसून यावी म्हणून तू ह्या गोष्टींचा अभ्यास ठेव; ह्यांत गढून जा.**

### ३.३.४ जेव्हा आपण लहानसहान बाबतीत विश्वासू राहाल, तेव्हा परमेश्वर आपणास पुढील गोष्टींसाठी बढती देईल

मत्तय २५:२३

**[२३] त्याला त्याच्या धन्याने म्हटले, शाबास, भल्या व विश्वासू दासा, तू थोडक्या गोष्टींत विश्वासू राहिलास, मी तुझी पुष्कळावर नेमणूक करीन; तू आपल्या धन्याच्या आनंदांत सहभागी हो.**

### ३.३.५ आत्मसंतुष्ट राहू नका. परमेश्वराने आपणास वाढवावे म्हणून त्यास मोकळीक द्या.

फिलिप्पै. ३:१२

**[१२] एवढ्यांतच मी मिळविले, किंवा एवढ्यांतच मी पूर्ण झालो आहे असे नाही तर ज्यासाठी ख्रिस्त येशूने मला आपल्या कह्यांत घेतले ते मी आपल्या कह्यांत घ्यावे म्हणून मी त्याच्या मागे लागतो आहे.**

### ३.३.६ तयारीची वेळ कधी वाया जात नाही. जितके मोठे पाचारण, तितक्या मोठ्या तयारीची गरज भासेल.

### ३.३.७ घाई करू नका. तयारीचा काळ पूर्ण होऊ द्या.

नीतिसूत्रे २१:५

**[५] उद्योग्याचे विचार समृद्धि करणारे असतात. जो कोणी उतावळी करितो तो दारिद्र्याकडे धाव घेतो.**

उदाहरण : मोशे, दावीद, पौल.

### ३.३.८ पाचारण व कृपादानांच्या आपल्या क्षेत्रात राहावे.

परमेश्वराने ज्या गोष्टीची योजना केलेली नाही, तसे बनण्याचा प्रयत्न करू नका.

# ४

# त्याचा हेतू पूर्ण करण्यासाठी आपले स्थान ग्रहण करणे

आमच्या जीवनासाठी परमेश्वराची इच्छा पूर्ण करण्याच्या प्रक्रियेचा एक भाग आहे आपले स्थान ग्रहण करणे किंवा स्थापन होणे यासाठी की योग्य वेळी आपणास योग्य स्थानी राहता यावे.

'स्थापन होणे' किंवा आपले स्थान ग्रहण करणे याचा अर्थ परमेश्वराप्रत संवेदनशील असणे, योग्य वेळी योग्य स्थानी राहणे व योग्य कार्य करावयास शिकणे होय.

## ४.१ त्याचा हेतू पूर्ण करण्यासाठी आपले स्थान ग्रहण करणे

एस्तेर ४:१२-१४

**१२ एस्तेरचे हे म्हणणे मर्दखयात कळविण्यास आले. १३ तेव्हा त्याने त्याच्या हस्ते एस्तेरला सांगून पाठविले की, तू राजमंदिरांत आहेस म्हणून तू यहूदी लोकातून वाचून राहशील असे तुझ्या मनास वाटू देऊ नको. १४ तू या प्रसंगी गप्प राहिलीस तरी दुसऱ्या कोठूनही यहूद्यांची सुटका व उद्धार होईलच. पण मग तुझा व तुझ्या बापाच्या घराण्याचा नाश होईल. तुला या असल्याच प्रसंगासाठी राजपद प्राप्त झाले नसेल कशावरून?**

आम्हास योग्य वेळी योग्य स्थानी राहावयाचे आहे, यासाठी की आम्हास परमेश्वरास जे हवे आहे ते आम्हास करता यावे.

## ४.२ त्याची तरतूद मिळविण्यासाठी आपले स्थान ग्रहण करणे

१ राजे १७:१-६

**[१] एलीया तिश्बी हा गिलाद येथे उपरी म्हणून राहणाऱ्यापैकी एक होता; तो अहाबास म्हणाला, इस्राएलाचा देव परमेश्वर ज्याच्या हुजुरास मी असतो**

**त्याच्या जीविताची मी शपथ वाहून सांगतो की, जी वर्षें आता येणार त्यात
दहिंवर अथवा पर्जन्य पडणार नाही; हे सर्व माझ्या सांगण्याप्रमाणे होईल. २
परमेश्वराचे वचन त्यास प्राप्त झाले की, ३ येथून निघून पूर्व दिशेस जा, व
यार्देनसमोरच्या करीथ ओहळानजीक लपून राहा. ४ त्या ओहळाचे पाणी तुला
प्यावयास मिळेल आणि मी कावळयांस आज्ञा केली आहे, ते तुला अन्न
पुरवितील ५ परमेश्वराच्या सागण्याप्रमाणे करून तो यार्देनेसमोरच्या करीथ
ओहळानजीव  जाउन राहिला. ६ कावळे त्यास भाकरी व मांस सकाळसंध
याकाळ आणून देत, त्या ओहळाचे पाणी तो पिई. ७ कांही दिवसांनी ओहळ
आटून गेला, कारण त्या देशात पर्जन्यवृष्टि झाली नाही. ८ तेव्हा त्यास
परमेश्वरांचे वचन प्राप्त झाले की, ९ चल, सीदोनांतील सारफथ नगरांत जाऊन
राहा; पाहा, तुझे पोषण करण्याची तेथल्या एका विधवेस मी आज्ञा केली
आहे.**

आम्हास योग्य वेळी योग्य ठिकाणी राहावयाचे आहे, जेणेकरून आम्हास आमच्या जीवनासाठी परमेश्वराच्या तरतूदीचा लाभ घेता यावा.

जर आम्ही स्वतः आपले स्थान घेत नाही व परमेश्वराची तरतूद गमावून बसतो, तर आम्ही परमेश्वराला दोष देऊ शकत नाही.

## ४.३ संरक्षण मिळविण्यासाठी आपले स्थान ग्रहण करणे

स्तोत्र ९:१

**१ मी अगदी मनापासून परमेश्वराचे उपकारस्मरण करीन; तुझ्या सर्व अद्‌भुत कृतीचे वर्णन करीन.**

सर्वात सुरक्षित ठिकाण परमेश्वराच्या इच्छेत आहे, जे कार्य करावे अशी परमेश्वराची इच्छा आहे, ते कार्य करा, त्याच स्थानी राहा जेथे परमेश्वरास वाटते की आपण राहावे, आणि त्याच वेळी जेव्हा परमेश्वरास वाटते की आपण करावे.

## ४.४ प्रगती अथवा पदोन्नती मिळविण्यासाठी आपले स्थान ग्रहण करणे

२ शमुवेल २:१-४

**१ यानंतर दाविदाने परमेश्वरास प्रश्न विचारिला की मी यहूदाच्या एखाद्या
नगरांत जाऊ काय? परमेश्वराने म्हटले; जा. दाविदाने विचारिले, कोणीकडे
जाऊ? त्याने म्हटले, हेब्रोनास जा. २ मग दावीद इज्रेलीन अहीनवाम आणि
नाबालीची स्त्री कर्मेलीण अबीगईल या आपल्या दोघी स्त्रियांसह तेथे गेला. ३
त्याप्रमाणेच दाविदबरोबर जे पुरुष होते त्या सर्वांस आपआपल्या कुटुंबांसह
त्याने बरोबर नेले, व ते हेब्रोनाच्या गावात जाउन राहिले. ४ यहूदी लोकांनी
तेथे जाउन दाविदास अभिषेक करून यहूदाच्या वंशाचा राजा नेमिले. दाविदास
असे कळून आले की शौलास ज्यांनी मूठमाती दिली ते याबेश-गिलादचे लोक
होते.**

आम्हास प्रगती, पदोन्नती व विकास प्राप्त करण्यासाठी आपले स्थान ग्रहण करावयाचे आहे ज्याची इच्छा परमेश्वर आमच्यासाठी बाळगतो.

## ४.५ परमेश्वराचे सांप्रत संजीवन अनुभव करता यावे म्हणून आपले स्थान ग्रहण करणे

### उदाहरण :

### पीतळीचा सर्प

निर्गम २१:५-८

**५ पण जर तो दास साफ म्हणू लागला की, माझ्या धन्यावर व माझ्या
बायकोमुलांवर मी प्रेम करितो, मी मुक्त होऊन जाणार नाही, ६ तर त्यांच्या
धन्याने त्याला देवासमोर आणून दारापाशी किंवा दाराच्या चौकटीपाशी उभे
करावे व आरीने त्याच्या कान टोचावा म्हणजे तो आयुष्यभर त्याची चाकरी
करील. ७ कोणी आपली मुलगी दासी म्हणून विकली तर तिने दासांप्रमाणे
निघून जाता कामा नये. ८ तिच्या धन्याने तिला आपली बायको करून घेण्याचे
ठरविले, आणि पुढे तिच्यावरून त्याची मर्जी उडाली, तर त्याने खंड घेऊन**

**तिला जाऊ द्यावे. त्याने तिला धोका दिल्यामुळे तिला परक्या लोकांना विकून टाकण्याचा त्याला अधिकार नाही.
[९] तिला आपल्या मुलासाठी ठेवून घ्यावयाचे असल्यास त्याने मिला मुलीप्रमाणे वागवावे.**

२ राजे १८:४

**[४] त्याने उच्च स्थाने काढून टाकिली, मूर्तिस्तंभ फोडिले, अशेरा मूर्तीचा उच्छेद केला व मोशेने केलेल्या पितळी सर्पांचे चूर्ण केले; कारण, हा काळपावेतो इस्राएल लोक त्यापुढे धूप जाळीत असत; त्यास नहुश्तान (पितळेचा तुकडा) हे नाव दिले होते.**

## मोशे

निर्गम १७:१-६

**[१] मग इस्राएल लोकांच्या सर्व समुदायाने सीन रानांतून कूच केले, आणि परमेश्वराच्या आज्ञाप्रमाणे मजल करून रफीदीम येथे तळ दिला; तेथे त्यांना प्यायाला पाणी नव्हते.
[२] म्हणून ते मोशेशी भांडू लागले व म्हणाले, आम्हाला प्यायाला पाणी दे. तेव्हा मोशे त्यांना म्हणाला, तुम्ही माझ्याशी का भांडता? परमेश्वराची परीक्षा का पाहता?
[३] पण तेथे लोकांना पाण्याचा शोष लागला आणि ते कुरकुर करून मोशेला म्हणाले, आम्हाला, आमच्या मुलांना व आमच्या गुरा-ढोरांना तहानेने मारून टाकायला तूं आम्हाला मिसर देशांतून बाहेर का आणिलेस?
[४] मोशेने परमेश्वराचा धावा करून म्हटले, ह्या लोकांना मी काय करूं? हे तर मला जवळजवळ दगडमार करायला तयार झाले आहेत.
[५] परमेश्वर मोशेला म्हणाला, तू लोकांच्या पुढे जा, इस्राएलांतील कांही वडील माणसें बरोबर घे आणि जी आपली काठी तू नील नदीवर आपटलीस ती हाती घेऊन चाल.
[६] पाहा होरेब डोंगरावरील एका खडकावर मी तुझ्यापुढे उभा राहीन; तू त्या खडकावर काठी आपट म्हणजे त्यांतून पाणी निघेल. लोक ते पितील आणि इस्राएलांच्या वडिला देखत मोशेने तसे केले.**

गणना २०:६-१२

**[६] तेव्हा मोशे व अहरोन हे मंडळीपुढून निघून दर्शनमंडपाच्या दारापाशी पालथे पडले, आणि परमेश्वराचे तेज त्यांच्या दृष्टीस पडले.
[७] परमेश्वर मोशेला**

**म्हणाला, ८ आपली काठी घे आणि तूं व तुझा भाऊ अहरोन मिळून मंडळी
जमा करा व त्यांच्यादेखत तुम्ही त्या खडकाला आज्ञा करा म्हणजे त्यांतून
पाणी निघेल; ह्याप्रमाणे त्यांच्यासाठी खडकातून पाणी काढ व ह्या मंडळीला
व त्यांच्या जनावरांना पाज. ९ परमेश्वराने आज्ञा केल्या प्रमाणे मोशेने
त्याच्यासमोरून ती काठी आणिली. १० मोशे व अहरोन ह्यांनी मंडळीला
खडकासमोर जमा केले, आणि त्यांना मोशे म्हणाला, अहो, बंडखोरांनो, ऐका;
तुमच्यासाठी आम्हीं ह्या खडकातून पाणी काढावयाचे काय? ११ मग मोशेने
हात उचलून त्या खडकावर दोनदा काठी मारिली, तेव्हा त्यांतून विपुल पाणी
वाहूं लागले, आणि ती मंडळी व त्यांची जनावरे पाणी प्याली; १२ ह्यावर
परमेश्वराने मोशे व अहरोन ह्यांना म्हटले,तुम्हीं माझ्यावर विश्वास ठेविला
नाही आणि इस्राएल लोकांसमक्ष माझे पावित्र्य प्रगट केले नाही, म्हणून ह्या
मंडळीला जो देश मी दिला आहे त्या देशास ह्यांना नेणे तुमच्या हातून घडणार
नाही.**

## योहानाचे शिष्य

योहान १:३६, ३७

**३६ येशूला जातांना न्याहाळून पाहून म्हणाला, हा पाहा, देवाचा कोंकरा! ३७
त्याचे हे म्हणणे त्या दोघा शिष्यांनी ऐकले व ते येशूच्या मागोमाग निघाले.**

- स्थापन, स्थान निश्चित करणे अथवा आपले स्थान ग्रहण करणे भौगोलिक, सामाजिक, व्यावसायिक किंवा संबंधात्मक असू शकते.
- स्थान ग्रहण करणे आमच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात लागू असते.

## ४.६ जेव्हा आपण आपले स्थान ग्रहण करता, तेव्हा खालील गोष्टी लक्षात ठेवाव्या :

- सोडून देण्यास तयार असावे.

### उदाहरण : लोटाची पत्नी

- अज्ञातात पाऊल टाकावयास तयार असावे.

इब्री ११:८

**८ अब्राहामाला पाचारण झाल्यावर जे ठिकाण त्याला वतनादाखल मिळणार होते तिकडे 'निघून जाण्यास तो विश्वासाने मान्य झाला; आणि आपण कोठे जातो हे ठाऊक नसतांहि तो निघून गेला.**

- आपण कसा प्रवेश करता, कसे जाता याविषयी सावध असावे.
- बदलासाठी तयार असावे.
- पुढे वाढण्यापूर्वी त्याची तयारी करावी.
- कधी कधी परमेश्वर आपले स्थान निश्चित करण्यासाठी इतरांच्या कार्यांचा उपयोग करील.

**उदाहरण : योसेफ**

- युद्धकुशल बना. ध्येय्यहीन होऊन इकडेतिकडे भरकटत फिरू नका.
- परमेश्वर आपल्या चुकांपेक्षा मोठा आहे, त्याच्या इच्छेनुसार तो आपणास पुन्हा स्थिर करील (उभे) करील.

**उदाहरण : मोशे व योना.**

# ५

# उच्च पाचारणाची किंमत

आपल्या जीवनासाठी परमेश्वराचा हेतू पूर्ण करण्यासाठी आपल्याला काही किंमत द्यावी लागेल.

लूक १४:२७

**२७ जो कोणी स्वतःचा वधस्तंभ घेऊन माझ्यामागे येत नाही त्याला माझा शिष्य होता येत नाही.**

गलती. ६:१४
**१४ आपला प्रभु येशू ख्रिस्त ह्याच्या वधस्तंभाच्या अभिमानाशिवाय कशाचाहि अभिमान बाळगणे माझ्या हातून न होवो; त्याच्याद्वारे जग मला वधस्तंभावर खिळलेले आहे व मी जगाला वधस्तंभावर खिळलेला आहे.**

## वधस्तंभ

- यातनेचे ठिकाण
- अलिप्ततेचे ठिकाण
- बलिदानाचे ठिकाण

बलिदान – ज्यावर आपला हक्क आहे ती वस्तू त्यागणे.

फिलिप्पै. ३:७
**७ तरी ज्या गोष्टी मला लाभाच्या होत्या त्या मी ख्रिस्तामुळे हानीच्या अशा समजलो आहे.**

योहान १२:२४-२६

**२४ मी तुम्हांला खचित खचित सांगतो, गव्हाचा दाणा जमिनींत पडून मेला नाही तर तो एकटाच राहतो, आणि मेला तर पुष्कळ पीक देतो. २५ जो आपल्या जिवावर प्रीति करितो तो त्याला मुकेल, आणि जो ह्या जगांत आपल्या जिवाचा द्वेष करितो तो त्याचे सार्वकालिक जीवनासाठी रक्षण करील. २६ जर कोणी माझी सेवा करील तर त्याने मला अनुसरावे म्हणजे जेथे मी आहे तेथे माझा सेवकहि असणार; जर कोणी माझी सेवा करील तर पिता त्याचा मान करील.**

आपण केलेला प्रत्येक त्याग आपणास परमेश्वराच्या राज्यासाठी आणखी लाभदायक बनवील.

## ५.१ रोजचे बलिदान

१ करिंथ. १५:३०-३३

**३० आम्हीहि घडोघडी जीव धोक्यांत का घालतो? ३१ बंधुजनहो, ख्रिस्त येशू आपला प्रभु ह्याच्या ठायी मला तुम्हांविषयी जो अभिमान आहे त्याला स्मरून मी प्रतिज्ञेवर सांगतो की, मी रोज रोज मरतो. ३२ मनुष्यस्वभाप्रमाणे म्हणावयाचे तर इफिसांत मी श्वापदांबरोबर लढाई केली ह्यांत मला काय लाभ? मेलेले उठविले जात नाहींत, तर 'चला, आपण खाऊ, पिऊ कारण उद्या मरावयाचे आहे.' ३३ फसू नका, कुसंगतीने नीति बिघडते.**

रोजचे बलिदान म्हणजे अनावश्यक गोष्टी स्वतःपासून दूर करणे, इतर लोक (आपले सोबती) जी कामे करतात, ती न करण्याची निवड करणे इत्यादी.

१ करिंथ. ९:२४-२७

**२४ शर्यतीत धावणारे सर्व धावतात, पण एकालाच बक्षीस मिळते हे तुम्हांला ठाऊक नाही काय? असे धावा, की तुम्हांला ते मिळेल. २५ स्पर्धेत भाग घेणारा प्रत्येकजण सर्व गोष्टींविषयी इंद्रियदमन करितो; ते नाशवंत मुगूट मिळविण्यासाठी असे करितात, आपण तर अविनाशी मुगूट मिळविण्यासाठी असे करितो. २६ ह्यास्तव मीहि तसाच धावतो, म्हणजे अनिश्चितपणे धावत नाही. तसेच मुष्टियुद्धहि करितो, म्हणजे वाऱ्यावर मुष्टिप्रहार करीत नाही; २७ तर मी आपलें शरीर कुदलतो व त्याला दास करून ठेवितो; असे न केल्यास मी**

**दुसऱ्यांस घोषणा केल्यावर कदाचित् मी स्वतः पसंतीस न उतरलेला असा ठरेन.**

रोम. १२:१-२

**[१] ह्यास्तव बंधुजनहो, मी देवाच्या करूणेमुळे तुम्हांला विनवितो की, तुम्ही आपली शरीरे जिवंत, पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून समर्पण करावी; ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे. [२] देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वतःचे रूपांतर होऊ द्या.**

## ५.२ जीवन बलिदान

उदाहरण : अब्राहाम (उत्पत्ती १२:१), मोशे (इब्री. ११:२४-२६)

जीवन बलिदान म्हणजे आपण परमेश्वराच्या राज्यासाठी जे बलिदान करता, ते मुख्य बलिदान आहे.

उदाहरण : भौगोलिकदृष्ट्या दुसऱ्या ठिकाणी राहून वसणे, नोकरी त्यागणे इत्यादी.

## ५.३ आत्म्याच्या मार्गदर्शनासाठी केलेले बलिदान आणि शारीरिक बलिदान

योहान ३:६

**६ देहापासून जन्मलेले देह आहे आणि आत्म्यापासून जन्मलेले आत्मा आहे.**

१ करिंथ ३:१२-१५

**१२ ह्या पायावर कोणी सोने, रूपे, मोलवान् पाषाण, लाकूड, गवत, पेंढा ह्यांनी बांधितो; १३ तर बांधणाऱ्या प्रत्येकाचें काम उघड होईल; तो दिवस तें उघडकीस आणील; कारण तो अग्नीसह प्रगट होईल आणि प्रत्येकाचे काम कसे आहे ह्याची परीक्षा ह्या अग्नीनेंच होईल. १४ ज्या कोणाचे त्या पायावर बांधलेले काम टिकेल त्याला मजुरी मिळेल. १५ ज्या कोणाचे काम जळून जाईल,**

**त्याचा तोटा होईल, तथापि तो स्वतः तारला जाईल; परंतु जणू काय अग्नींतून बाहेर पडलेल्यासारखा तारला जाईल.**

रोम १२:१-२

**१ ह्यास्तव बंधुजनहो, मी देवाच्या करूणेमुळे तुम्हांला विनवितो की, तुम्ही आपली शरीरे जिवंत, पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून समर्पण करावी; ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे.
२ देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वतःचे रूपांतर होऊ द्या.**

- आपण जी किंमत चुकवावी असे परमेश्वरास वाटते, ती कदाचित इतरांस चुकवावी लागणार नाही.
- आनंदाने किंमत चुकवावी.

# ६

# आपली धाव पूर्ण करणे

लूक १४:२७-३५

**२७ जो कोणी स्वतःचा वधस्तंभ घेऊन माझ्यामागे येत नाही त्याला माझा शिष्य
होता येत नाही. २८ तुमच्यामध्ये असा कोण आहे की त्याला बुरुज बांधावयाची
इच्छा असता तो अगोदर बसून व खर्चाचा अंदाज करून आपल्याजवळ तो पुरा
करण्याइतकी ऐपत आहे की नाही हे पाहत नाही? २९ नाही तर कदाचित् पाया
घातल्यावर त्याला जर तो पुरा करिता आला नाही तर पाहणारे सर्व लोक
त्याचा उपहास करून म्हणतील, ३० हा मनुष्य बांधू लागला खरा, परंतु ह्याला
तो पुरा करिता आला नाही. ३१ अथवा असा कोण राजा आहे की तो दुसऱ्या
राजाबरोबर लढाईंत सामना करण्यास निघाला असता अगोदर बसून विचार
करीत नाही की, जो वीस हजार घेऊन माझ्यावर येतो, त्याच्यावर मला दहा
हजारांनिशी जाता येईल काय? ३२ जर जाता येत नसेल तर तो दूर आहे तोंच
तो वकिलांस पाठवून सलोख्याचे बोलणे लावील. ३३ म्हणून त्याचप्रमाणे
तुम्हांपैकी जो कोणी आपल्या सर्वस्वाचा त्याग करीत नाही त्याला माझा शिष्य
होता येत नाही. ३४ मीठ हा चांगला पदार्थ आहे; पण मिठाचा खारटपणाच
गेला तर त्याला रुची कशानें आणतां येईल? ३५ तें जमिनीला किंवा उकिरड्यालाहि
उपयोगी नाहीं; तें बाहेर टाकून देतात. ज्याला ऐकावयास कान आहेत तो
ऐको.**

उत्तम सुरूवात पुरेशी नाही. आम्हास आपली धाव पूर्ण करण्यासाठी धैर्य हवे.

## ६.१ नियोजन

**आम्हास किंमत द्यावी लागेल. ह्या प्रक्रियेचा एक भाग आहे 'नियोजन किंवा योजना आखणे.' नियोजन म्हणजे दूरदृष्टी बाळगणे. ही येणाऱ्या घटनांची अपेक्षा आहे आणि नंतर काय करावयाचे ते ठरवायचे आहे.**

नीतिसूत्रे ४:२६
**६ आपल्या पायांची वाट सपाट कर, तुझे सर्व मार्ग निश्चित असोत.**

नीतिसूत्रे ६:६-८
**६ अरे आळशा, मुंगीकडे जा, तिचे वर्तन पाहून शहाणा हो, ७ तिला कोणी ध**
**ानी, देखरेख करणारा किंवा अधिपति नसता, ८ ती उन्हाळ्यांत आपले अन्न**
**मिळविते, आणि कापणीच्या दिवसांत आपले भक्ष्य जमा करून ठेविते.**

नीतिसूत्रे १४:८-१५
**८ शहाण्याने आपला मार्ग जाणणे यांत त्याची सुज्ञता असते, पण मूढाची मूढता**
**कपटरूप होय. ९ मूर्खाला अपराध करणे म्हणजे थट्टा वाटते, परंतु सरळांत**
**परस्पर प्रेमभाव असतो. १० हृदयाला आपल्या ठायींच्या खेदाची जाणीव असते,**
**आणि परक्याला त्याच्या आनंदाच्या आड येववत नाही.**
**११ दुर्जनांचे घर कोसळते, सरळांचा तंबू चांगला राहतो. १२ मनुष्याला एक**
**सरळ मार्ग दिसतो, पण त्याच्या शेवटास मृत्युपथ फुटतात. १३ हसतांना देखील**
**हृदय खिन्न असते, आणि हर्षाचा शेवट दुःखांत असते. १४ भ्रांत चित्ताचा**
**मनुष्य आपल्या वर्तनाचे फळ भोगितो, आणि सत्पुरुष आपल्या ठायीं तृप्त**
**असतो. १५ भोळा प्रत्येक शब्दावर विश्वास ठेवितो, शहाणा नीट पाहून पाऊल**
**टाकितो.**

नीतिसूत्रे २२:३
**३ चतुर मनुष्य अरिष्ट येता पाहून लपतो, भोळे पुढे जातात आणि हानि पावतात.**

आमच्या जीवनासाठी परमेश्वराची इच्छा काय आहे ह्या ज्ञानाप्रमाणे आम्ही योजना आखतो. आम्ही स्वतःस व आपल्या योजनांस त्याच्या इच्छेपुढे अर्पण करतो.

२ करिंथ १:१५-१७
**१५ असा भरंवसा बाळगून तुम्हांस दोनदा कृपादान मिळावें म्हणून पहिल्यानें**
**तुम्हांकडे यावें, १६ तुम्हांकडून मासेदोनियास जावें, नंतर पुन्हा मासेदोनियाहून**
**तुम्हांकडे यावें, आणि तुम्हीं मला यहूदीयाकडे वाटेस लावावें, असा माझा बेत**

**होता. [१७] तर असा बेत असतां मी चंचलपणा केला काय? अथवा मला होय होय, नाहीं नाहीं अशी धरसोड करतां यावी म्हणून जें मी योजितों तें देहस्वभावाप्रमाणे योजितो काय?**

आम्ही देहाप्रमाणे योजना आखीत नाही, परंतु आत्म्यानुसार आखतो.

आम्हास आत्म्याने प्रेरित योजना तयार करावयाच्या आहेत, अमलात आणावयाच्या आहेत जी आम्हास शेवटच्या रेषेपर्यंत पुढे नेण्यात सहायक ठरतील. परमेश्वर नेहमी आमची बुध्दी, तर्क व विचार दूर सारून कार्य करीत नाही (अर्थात कध ी कधी तो असे करतो). परमेश्वरानेच आम्हास बुध्दी, तर्क व विचार दिले आहेत आणि जेव्हा  आम्ही आपली अंतःकरणे त्याच्या हाती सोपवितो, तेव्हा तो त्या विचारांस/योजनांस/ कल्पनांस/युध्दनीतींस चालना देऊ शकतो जी आम्हास त्या योजनांत पुढे वाढण्यास मदत करते ज्याची योजना त्याने तयार केली आहे.  समस्या ही आहे की कधी कधी आम्ही इतके अधिक "आत्म्यातं" वाहून जातो की जे पात्र त्याने घडविले आहे ते आम्ही दूर सारून देतो, ज्याचा तो वापर करतो,  अर्थात् आमचे मन/बुध्दी. या विपरीत आमच्या आधुनिक पध्दती/साधने/तंत्रविज्ञान यासमवेत आम्ही इतके अधिक 'देहात' चालू लागतो की आत्मा काय म्हणतो ते आम्हास ऐकूच येत नाही.

## पास्टर जॅक हेफोर्ड यांनी लिहिलेल्या 'आत्म्याद्वारे प्रेरित नियोजन' यावर टिपणे

जेव्हा तो आम्हास प्रेरित करतो की आम्ही आपल्या प्रतिफळाची अपेक्षा करावी, तेव्हा आम्ही त्याप्रमाणे प्रार्थना करतो. जेव्हा आम्हास कपात करावयाची गरज भासते, तेव्हा स्वतःस गुन्हेगार न समजता आम्ही असे करतो. आम्ही "लक्ष्य" ठरवीत नाही, म्हणून आम्हास त्यास वाचविण्याची गरज नाही. हा परमेश्वराचा हेतू आहे जो वेळेवर समजून घेता येतो.

जेव्हा दैहिक आवेश आत्मिक धेय्याबरोबर जुळतो, तेव्हा लोक व संस्था यांचा लोप होऊ लागतो.

परमेश्वराच्या व्यवस्थेत कधी अशाप्रकारची निराशाजनक परिस्थिती उद्भवणे शक्य नाही की लोकांचा चुराडा करावा अथवा प्रामाणिकपणाचे मोल देऊन, लुबाडणूकीसाठी युक्ती करून किंवा जगीक पद्धतीने क्रयविक्रय करून आर्थिक निवेदनाचा आग्रह करावा.

परंतु आमची इच्छा 'जन्माची योजना आखणे' नसून, "योजनेस जन्म देणे ही आहे." दृष्टांताची कल्पना, योजनांचे गर्भारपण, आणि प्रसुती हे सारे काही प्रार्थना व मार्गदर्शनासाठी पवित्र आत्म्यावर पूर्णपणे अवलंबून राहून पूर्ण केले जाते - यासाठी की सुधारणा करता यावी, वेळ ठरविता यावी, विश्वासास चालना देता यावी, साधनसामग्री मुक्त करावी आणि प्रतिसाद देण्यासाठी उत्तेजित करावे.

- *पवित्र आत्म्याच्या स्पष्ट मार्गदर्शनावाचून आम्ही कुठलीही जबाबदारी स्वीकार करणार नाही, ज्याची पुष्टी वडिलमंडळाद्वारे करण्यात आली आहे.*
- *प्रभावी बनण्यासाठी मनुष्याच्या बुद्धी व शैलीवर अवलंबून असलेली बढती व संपत्ती गोळा करणाऱ्या कुठल्याही साधनांचा आम्ही उपयोग करणार नाही.*
- *आम्ही अशा कुठल्याही गोष्टीचे अनुसरण करणार नाही ज्याद्वारे उपासना, परस्पर संबंध, शिष्यत्व व सेवाकार्याच्या प्राथमिकतेकडे दुर्लक्ष केले जाईल.*
- *आम्ही अतिशय, बहुधा व नेहमीच प्रार्थना करीत राहणार.*
- *आम्ही परमेश्वरावर विश्वास करतांना विचार करू की त्याने आम्हास स्पष्टता, सुबोधता व खात्री द्यावी.*
- *"विश्वासावाचून देवास प्रसन्न करणे अशक्य आहे" हे जाणून आम्ही विश्वास करू. जेव्हा आम्ही असे करू, तेव्हा तो आम्हास आपल्या उद्दिष्टांमध्ये पुढे वाढू देईल.*

## ६.२ अंतिम रेषेपर्यंत धावणे

इब्री १२:१,२

**[१] तर मग आपण एवढ्या मोठ्या साक्षीरूपी मेघानें वेढिलेले आहों म्हणून आपणहि सर्व भार व सहज गुंतविणारें पाप टाकून आपल्याला नेमून दिलेल्या धावेवरून धीरानें धावावें; [२] आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू ह्याच्याकडे पाहत असावें; जो आंनद त्याच्यापुढें होता त्याकरितां त्यानें लज्जा तुच्छ मानून वधस्तंभ सहन केला, आणि तो देवाच्या राजासनाच्या 'उजवीकडे बसला आहे.'**

आपली धाव पूर्ण करण्यासाठी आपल्याला कोणत्या गोष्टीची गरज आहे?

आता मी काय करू शकतो जेणेकरून मला हे आश्वासन लाभावे की मी शेवटच्या रेषेपर्यंत आपली धाव पूर्ण करू शकेन?

- सर्व भार दूर करावा.
- सहज गुंतविणारे पाप टाकून द्यावे.
- धीराने धावावे.
- येशूकडे पाहावे.

## प्रेषित पौल

प्रेषितांची कृत्ये २०:२२-२४

**[२२] पण आतां पाहा, मी अंतर्यामीं बद्ध होऊन यरूशलेमेंत जात आहें, तेथें मला काय काय होईल तें माहीत नाहीं; [२३] केवळ इतकें कळतें कीं, बंधनें व संकटें माझी वाट पाहत आहेत; ह्याविषयीं पवित्र आत्मा मला नगरोनगरीं साक्ष देत आहे. [२४] मी तर आपल्या प्राणाची किंमत एवढीसुद्धां करीत नाहीं, ह्यासाठीं कीं, मीं, आपली धाव आणि देवाच्या कृपेची सुवार्ता निश्चितार्थानें सांगण्याची जी सेवा मला प्रभु येशूपासून प्राप्त झाली आहे ती शेवटास न्यावी.**

प्रेषितांची कृत्ये २१:१३

**१३ तेव्हां पौलानें उत्तर दिलें, तुम्ही रडून माझें मन खचवितां, हें काय? मी नुसता बंधनांत पडण्यासच नव्हें, तर प्रभु येशूच्या नांवासाठीं यरूशलेमेंत मरावयास देखील तयार आहें.**

पौलाने स्वतःच्या जीवास मौल्यवान मानिले नाही, तर त्याने आपली धाव व त्याला सोपविण्यात आलेली सेवा पूर्ण केली.

२ तीमथ्य. ४:६-८

**६ कारण आतां माझें अर्पण होत आहे, आणि माझा प्रयाणकाळ जवळ आला आहे ७ जें सुयुद्ध तें मीं केलें आहे, धाव संपविली आहे, विश्वास राखिला आहे; ८ आतां जें राहिलें तें हेंच कीं, माझ्यासाठीं नीतिमत्त्वाचा मुकुट ठेविला आहे; प्रभु जो नीतिमान् न्यायाधीश आहे तो त्या दिवशीं मला तो मुकुट देईल; आणि तो केवळ मलाच नव्हे, तर त्याचें प्रगट होणें ज्यांना प्रिय झालें त्या सर्वांनाहि देईल.**

आपल्या जीवनासाठी परमेश्वराच्या स्वप्नांचा पाठपुरावा करीत आपल्या प्रवासाचा आनंद घ्यावा!

Bible College
& MINISTRY TRAINING CENTRE

# ckbcy dkWy;t

ऑल पीपल्स चर्च ॲण्ड वर्ल्ड आऊटरीच, बँगलोर, भारताने आपल्या सेवकार्याचा विस्तार केला आहे. ऑगस्ट २००५ मध्ये या सेवासंस्थेद्वारे बाइबल कॉलेज व मिनिस्ट्री ट्रेनिंग सेन्टर (ए पी सी व एम टी सी) ची स्थापना करण्यात आली

ए पी सी व एम टी सी भारतद्वारे तसेच इतर राष्ट्रांतील गावांस, नगरांस व शहरांस येशू ख्रिस्तासाठी प्रभावित करण्यासाठी विश्वासू स्त्री व पुरुषांस तयार व प्रशिक्षित करण्यात येते व सेवेसाठी पाठविण्यात येते.

**ए पी सी व एम टी सी यात दोन कार्यक्रम योजण्यात आले आहेत :**

- ❑ दोन वर्षांचा बाइबल कॉलेज अभ्यासक्रम पूर्णकालीन विद्यार्थ्यासाठी आहे आणि उत्तम शिकवणीसोबतच आध्यात्मिक व व्यावहारिक सेवा प्रशिक्षण देण्यात येते. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांस परमेश्वराचे पाचारण यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी तयार करण्याच्या निमित्ताने व त्यांस समर्थ बनविण्याच्या हेतूने करण्यात आला आहे. यशस्वीरित्या अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांस **डिप्लोमा इन थियॉलॉजी ॲण्ड क्रिश्चियन मिनिस्ट्री** चे प्रमाणपत्र देण्यात येईल.

- ❑ व्यवहारिक सेवा प्रशिक्षण बायबल कॉलेज अशा पदवीधरांसाठी आहे जे व्यवहारिक प्रशिक्षण प्राप्त करू इच्छितात. एक किंवा दोन वर्षे पूर्ण करणाऱ्यांस सर्टिफिकेट इन प्रॅक्टिकल मिनिस्ट्री दिले जाईल ज्यात त्यांच्या प्रशिक्षणकाळाचा उल्लेख असेल.

वर्ग इंग्रजी भाषेत असतील. आमच्याजवळ प्रशिक्षित व अभिषक्त शिक्षक आहेत. सर्व शिक्षक व विद्यार्थी ए.पी.सी. शिक्षण केन्द्र व वाचनालय (SC&L) यांचा लाभ घेऊ शकतात. यांत पुस्तके, टीचिंग टेप्स, विडियो, विसीडी/डिवीडी आणि गीतगायन सीडी यांचा संग्रह आहे.

# ऑल पीपल्स चर्च द्वारा प्रकाशित पुस्तके

राज्याची स्थापना करणारे

आपल्या जीवनासाठी परमेश्वराचा हेतू पूर्ण करणे

# vkly ihiYl ppfo"k;h

**ऑल पीपल्स चर्च (एपीसी) चा दष्श्टांत बँगलोर षहरात मीठ व प्रकाष बनणे, व भारत देषात व जगातील देषासाठी एक आवाज बनणे आहे.**

आम्ही ए पी सी चर्चमध्ये संपूर्ण, कुठल्याही प्रकारची तडजोड न करता आणि त्याच्या पवित्र आत्म्याच्या प्रकटीकरणासमवेत देवाच्या वचनाचा प्रचार करण्याप्रीत्यर्थ समर्पित आहोत. आमचा असा विष्वास आहे की उत्तम संगीत, सष्जनषील प्रकटीकरण, कळकळीची प्रार्थना, तत्कालीन सेवेच्या पद्धती इत्यादी गोश्टी देवाच्या वचनाचा पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने प्रचार करणे, तसेच चिन्ह, चमत्कार व पवित्र आत्म्याच्या कृपादाने यांचा पर्याय बनू षकत नाहीत (१ करिंथ २:४,५; इब्री. २:३,४). **आमची विशयवस्तू येषू आहे, आमचा विशय वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचे ओझे लोक आहेत आणि आमचा हेतू खिस्तासमान परिपक्वता आहे.**

कारण आम्ही आपली घोशणा करीत नाही; तर खिस्त येषू हा प्रभु आहे अषी आणि येषूप्रीत्यर्थ आम्ही तुमचे दास आहो अषी स्वतःची घोशणा करितो. आम्ही त्याची घोशणा करितो, सर्व प्रकारच्या ज्ञानानें प्रत्येक माणसाला बोध करितो व प्रत्येक माणसाला षिकवितो; अषासाठी की, प्रत्येक माणसाला खिस्ताच्या ठायी पूर्ण असे उभे करावे (२ करिंथ ४:५; कलस्सै. १:२८).

आमचा विष्वास आहे की ह्या पुस्तकाद्वारे आपणास आषीर्वाद लाभला असेल. आमच्यातर्फे आपणासाठी ही विनामूल्य भेट आहे. हे विनामूल्य आहे.

या पुस्तकाच्या हजारो प्रती आपल्यासारख्या लोकांस विनामूल्य देण्यात येतात. आमची अषी इच्छा आहे की आपण आर्थिकरित्या आमचे भागीदार बनावे जेणेकरून अनेकांस देवाचे वचन देण्यास आम्हास सहकार्य प्राप्त व्हावे. आपल्या सतत आर्थिक मदतीद्वारे देवाचे वचन इतर लोकांप्रत पोहोचविण्यास आम्हास मदत मिळेल. जसे देव आपले मार्गदर्षन करतो, त्याप्रमाणे ऑल पीपल्स चर्चचे भागीदार बना. आपण आपली दाने चेक/डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डरद्वारे “ऑल पीपल्स चर्च, बँगलोर,” च्या नावाने पाठवू षकता. या पुस्तकाद्वारे आपणास कषी मदत लाभली हे कृपया आम्हास कळवावे, तसेच आपल्या प्रार्थना विनंत्या व आपले विचार आम्हास लिहून कळवा.

कृपया खालील पत्त्यावर आमच्याषी संपर्क करावा :


**All Peoples Church & World Outreach**
2nd Floor, No. 7M, 2nd Block,
HRBR Layout, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-65970617
Email: contact@apcwo.org
Website: www.apcwo.org

# भारतात ऑल पीपल्स चर्चेस कोठे आहेत?

सध्या ऑल पीपल्स चर्चेस (एपीसी) खाली दिलेल्या पत्त्यावर आहेत :

ऑल पीपल्स चर्च - थोकोट्टू, मँगलोर (कर्नाकट)

ऑल पीपल्स चर्च - कल्याण, मुंबई (महाराश्ट्र)

ऑल पीपल्स चर्च - विषाखापट्नम (आन्ध्र प्रदेष)

ऑल पीपल्स चर्च - सनितपुर (आसाम)

ऑल पीपल्स चर्च - बऱ्हामपुर (ओडिसा)

नयमितपणे संपूर्ण भारत देषात वेळोवेळी नवनवीन मंडळ्यांची स्थापना होत आहे. नवीन यादी व ऑल पीपल्स चर्चषी संपर्क साधण्यासाठी व अधिक माहितीसाठी कृपया आमची वेबसाईट पाहावीः Website: www.apcwo.org तसेच ई मेल करावा : Email: contact@apcwo.org

# काय आपण त्या परमेश्वरास जाणता जो आपणावर प्रीती करतो?

सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी, परमेश्वर ह्या जगात मानव म्हणून आला. त्याचे नाव येशू आहे. त्याने पूर्णतया पापरहित जीवन घालविले. येशू देहधारी देव होता, जे काही त्याने म्हटले व केले त्याद्वारे देव आम्हावर प्रगट झाला. जे शब्द तो बोलला, ते देवाचे शब्द होते. जी कार्ये त्याने केली, ती देवाची कार्ये होती. या पृथ्वीतलावर असतांना येशूने अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यास व दुखितांस बरे केले. त्याने अंधांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि सर्व प्रकारच्या रोग्यांस व आजाऱ्यांस बरे केले. त्याने चमत्कारिकत्यिा भारी व दोन मासे बहुगुणित करून भुकेल्यांस अन्न चारले, त्याने वादळ शांत केले व इतर अनेक अद्भुत कृत्ये केली.

**ही सर्व कामे हे सिद्ध करतात की परमेश्वर चांगला आहे, ज्याची इच्छा आहे की लोकांनी आरोग्यवान, सुदृढ व आनंदी असावे. परमेश्वर आपल्या लोकांच्या गरजा पुरवू इच्छितो.**

म्हणून, परमेश्वराने मनुष्य बनून आमच्या जगात पाऊल टाकण्याचा निर्धार का केला? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे व आम्हास उत्पन्न करणाऱ्या परमेश्वरासमोर अस्वीकारणीय अशी कृत्ये केली. पापाचे परिणाम आहेत. पाप हे एका परमेश्वर व मनुष्यामधील एका भिंतीप्रमाणे आहे जिस ओलांडता येत नाही पाप आम्हास परमेश्वरापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले त्यास जाणून घेण्यापासून व त्याच्याबरोबर अर्थपूर्ण नाते ठेवण्यापासून ते आम्हास रोखते. म्हणूनच, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींद्वारे ही पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापाचा दूसरा परिणाम म्हणजे परमेश्वरापासून सदाकाळसाठी दूर केले जाणे. देवाच्या न्यायालयात पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू म्हणजे नरकात परमेश्वरापासून सर्वकाळसाठी वेगळे होणे.

**परंतु सुवार्ता ही आहे की आपण पापापासून मुक्ती प्राप्त करून परमेश्वरासोबत समेट करू शकतो. पवित्र शास्त्र म्हणते, (रोम. ६:२३). जेव्हा येशू वध ास्तंभावर मरण पावला तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापाचे मोल दिले. त्यानंतर तीन दिवसांनी तो मरणांतून उठला आणि त्याने अनेकांस दर्शन देऊन आपण जीवंत असल्याचे दाखवून दिले आणि त्यानंतर तो स्वर्गास निघून गेला.**

परमेश्वर प्रेम व दया यांनी युक्त असा परमेश्वर आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही नरकात जावे. आणि म्हणूनच पापांपासून व त्याच्या स्थायी परिणामांपासून मानवजातीस सुटका प्राप्त व्हावी म्हणून मार्ग दाखविण्यासाठी तो आला. तो पाप्यांस वाचविण्यासाठी आला, तुमच्या व माझ्यासारख्या लोकांस पाप व सार्वकालिक मृत्यूपासून मुक्त करण्यासाठी तो आला.

पापांपासून विनामूल्य क्षमा मिळविण्यासाठी पवित्र शास्त्र आम्हास केवळ एकच कार्य करावयास सांगते - जे काही येशूने वधस्तंभावर केले आहे त्याचा स्वीकार करणे व संपूर्ण अंतःकरणाने त्याचा स्वीकार करणे.

**" त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नांवानें पापांची क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयीं देतात.**" (प्रेषितांची कृत्ये १०:४३).

**"येशू प्रभु आहे असें जर 'तूं आपल्या मुखानें' कबूल करिशील आणि देवानें त्याला मेलेल्यातूंन उठविलें असा 'आपल्या अंतःकरणांत' विश्वास ठेवशील तर तुझें तारण होईल**" (रोम. १०:६).

जर आपण प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवाल, तर आपणही आपल्या पापांची क्षमा व पापांपासून शुद्धता प्राप्त करू शकता.

खाली आपणासाठी एक सोपी प्रार्थना दिलेली आहे जी आपणास प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास व जे काही त्याने आपणासाठी केले त्यावर विश्वास ठेवण्यासाठी निर्णय घेण्यात मदत करील. जे काही येशू ख्रिस्ताने केले आहे त्याचा स्वीकार करून आपल्या पापांपासून क्षमा व शुद्धता मिळविण्यास ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शिका आहे. आपण आपल्या शब्दांतसुद्धा प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभू येशू, जे काही तू वधस्तंभावर कले ते मला आज समजले आहे. तू माझ्यासाठी मेलास, आपले अनमोल रक्त तो माझ्यासाठी वाहिलेस आणि माझ्या पापांची शिक्षा तू सहन केलीस, यासाइी की मला क्षमा प्राप्त व्हावी. पवित्र शास्त्र म्हणते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्यास त्याच्या पापांची क्षमा मिळेल.*

*आज, मी तुजवर विश्वास करण्याचा व वधस्तंभावर मरण्याद्वारे च मेलेल्यांतून जीवंत होण्याद्वारे तू जे काही माझ्यासाठी केले आहेस त्याचा स्वीकार करण्याचा मी निर्णय घेतो. मला हे काहीत आहे की मी उत्तम कृत्त्यांद्वारे स्वतः वाचवू शकत नाही. कोणी मनुष्यही मला वाचवू शकत नाही. मी आपल्या पापांची क्षमा विकत घेऊ शकत नाही.*

*आज, मी अंतःकरणापासून विश्वास धरतो व आपल्या मुखाने हे कबूल करतो की तू साझ्यासाठी आपला प्राण दिलास, माझसया पापांची किंमत चुकविलीस. तू माझ्यासाठी पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुजवर विश्वास करण्याद्वारे मला पापांची क्षमा व शुध्द्रता मिळू शकली.*

*धन्यवाद येशू. तुजवर प्रीती करण्यास व तुला अधिक जाणून घेण्यास व तुजविषयी विश्वासू राहण्यात माझी मदत कर. आमेन.*

नोट्स